१०४ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, रविवार १४ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१०१, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 101 Marathi - Daily - Mumbai, 14 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
घरची कामं करा आणि तासाला २५० रुपये कमवा!
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# जैन साधूंसाठी मुंबईच्या रस्त्यांवर पुन्हा पांढरे पट्टे
# मनसेचा संताप! अखेर पट्ट्यांना काळा रंग लावला

■ मुंबई



**मुंबईतील घाटकोपर विद्याविहार परिसरात जैन धर्मगुरू आणि साध्वींच्या आगमनासाठी रस्त्यांवर पांढऱ्या पट्टे रंगवल्यावरून वाद ताजा असतानाच आज दादरमधील रस्त्यावरही तशाच प्रकारच्या पट्ट्या दिसल्या. या पट्ट्यांना मनसे नेते संदीप देशपांडे यांनी जोरदार आक्षेप घेत महापालिका प्रशासनाला दुपारी ३ वाजेपर्यंत हे पट्टे हटविण्याचा इशारा दिला. या इशाऱ्यानंतर पालिकेने धावपळ करून या पट्ट्यांवर काळा रंग फासला.**

**मात्र,** पालिकेची कुठलीही परवानगी न घेता सार्वजनिक ठिकाणी पट्टे कुणी रंगवले? मनसेने आंदोलन करेपर्यंत पालिकेने स्वतःहून कारवाई का केली नाही? पट्टे रंगवणाऱ्यांविरोधात कारवाई का नाही? असे प्रकार करून मुंबईतील मराठी माणसाला वारंवार डिवचण्याचा जाणूनबुजून प्रयत्न होतो आहे का? असे अनेक प्रश्न या घटनेने उपस्थित केले आहेत.

मनसे नेते संदीप देशपांडे यांचे दादर पश्चिम येथील डी. एस. बाबरेकर मार्गावरील जनसंपर्क कार्यालय आहे. या परिसरातील जैन समाजाच्या आराधना भवनापासून गोकुळ धाम इमारतीपर्यंत संपूर्ण गल्लीत पांढरे पट्टे मारण्यात आले होते. ही बाब लक्षात येताच रहिवासी आणि संदीप देशपांडे आक्रमक झाले. यावेळी देशपांडे यांनी 'सुरेस, परेस नरेस, चड्डीत राहायचे' असे लिहिलेला टी - शर्ट परिधान केला होता. त्यांनी महापालिका प्रशासनाला दुपारी ३ वाजेपर्यंत हे पट्टे हटविण्याचा इशारा दिला. पट्ट्यावरून वाद तापत असल्याचे लक्षात आल्यावर महापालिका प्रशासनाने याची दखल घेतली. पोलीसही त्या ठिकाणी पोहोचले. देशपांडे यांच्या इशाऱ्यानंतर महापालिकेचे अधिकारी थिनर (रंग काढण्यासाठी वापरण्यात येणारे द्रव्य) आणि अन्य साहित्य घेऊन इथे दाखल झाले. त्यांनी पट्टे हटवण्याचे काम सुरू केले. पण थिनरने रस्त्यावरचा रंग निघत नसल्याने शेवटी या पट्ट्यांवर काळा रंग लावण्यात आला.

या ठिकाणी जमलेल्या स्थानिक मराठी नागरिकांनी परिसरातील स्वच्छता आणि वाहतूक » पान २ वर

### मुस्लिमांना थांबवून दारववा जैन मुनीचे मनसेला आवाहन

दादर कबुतरखाना बंद केला तेव्हा कबुतरांना खायला घालणारच अशी आक्रमक भूमिका घेत उपोषणाचा इशारा देणारा जैन धर्मगुरु निलेश चंद्र मुनी याने पुन्हा एकदा दंड थोपटले. तो म्हणाला की, जैन समाज शांतताप्रिय आहे, याचा अर्थ जैन समाजाने बांगड्या भरल्या नाहीत. जैन समाजाला मी आवाहन करतो की, तुम्ही शांतता राखा. संदीप देशपांडे हे बाळासाहेब ठाकरेंचे विचार घेऊन पुढे जात असतील तर बाळासाहेब ठाकरे यांनी जैन, मारवाडी लोकांवर प्रेम केले. त्यांना कुठलाही त्रास दिला नाही. संदीप देशपांडे तुम्ही मुंब्रा, भेंडी बाजार, पायधुनीला जा. तिथे ज्याप्रकारे ईदच्या दिवशी किंवा नमाज पढताना रस्त्यावर पांढरे घालून बसतात त्याला विरोध करा. मुंब्र्यामध्ये एमआयएमची नगरसेविका म्हणते की मुंब्रा हरा कर दुंगी. त्याला तुम्ही विरोध करा, दोन समाजामध्ये तेढ निर्माण करू नका.

# शासकीय वसतिगृहातही जातीनुसार प्रवेश! नवा वाद

■ मुंबई

**राज्यात** अनुसूचित जाती प्रवर्गातील आरक्षणाच्या उपवर्गीकरणावरून राजकीय आणि सामाजिक वाद सुरू असतानाच सामाजिक



न्याय विभागाने वसतिगृह प्रवेशासाठी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीने नव्या वादाला तोंड फोडले आहे. या जाहिरातीत अनुसूचित जाती प्रवर्गातील जागांचे 'मांग', 'मेहतर' आणि 'इतर एससी' (अनुसूचित जाती)अशा स्वतंत्र वर्गवारीत विभाजन केले आहे. त्यावर विविध संघटनांनी आक्षेप नोंदवून राज्य सरकारने अद्याप उपवर्गीकरणाबाबत अंतिम निर्णय घेतलेला नसताना अशा प्रकारचे वर्गीकरण कोणत्या कायदेशीर आधारावर केले, असा सवाल उपस्थित केला आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या शासकीय वसतिगृहांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. २०२६-२७ शैक्षणिक वर्षासाठी शालेय विद्यार्थ्यांना ३० जूनपर्यंत, तर इयत्ता अकरावी व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना १५ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहे. मात्र, प्रवेशाच्या जाहिरातीत अनुसूचित जाती प्रवर्गातील जागांचे विभाजन 'मांग', 'मेहतर' आणि 'इतर एससी' अशा प्रकारे केले आहे. राज्यात » पान २ वर

# रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन सुरुच! भाजपा नेत्यांकडून खिल्ली

■ पंढरपूर

**पंढरपूरमध्ये** शेतकऱ्यांच्या कर्जाच्या जाचक अटी रद्द करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी कालपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले. या आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशीही कोणताच तोडगा निघाला नाही. आंदोलनस्थळी मोठ्या प्रमाणावर शेतकरी, कार्यकर्ते उपस्थित राहून समर्थन दर्शवत आहे. सरकारकडून या मुद्यावर तोडगा काढण्यासाठी हालचाली सुरू झाल्या असून, कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक निश्चित झाल्याची माहिती फोनवरून दिली. मात्र, ठोस आश्वासन मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, » पान २ वर

# आज भारत-पाकिस्तान महिला विश्वचषकाचा सामना

■ बर्मिंगहॅम

**आयसीसी** महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेतील भारताचा पहिला सामना उद्या रविवारी कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध होणार आहे. हा सामना बर्मिंगहॅममधील एजबॅस्टन मैदानावर भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल. भारतीय संघाचे कर्णधारपद अनुभवी हरमनप्रीत कौर सांभाळणार आहे, तर पाकिस्तानचे नेतृत्व फातिमा सना यांच्याकडे आहे. हे दोन्ही संघ विजयाने विश्वचषकाची मोहीम सुरू करण्याचा प्रयत्न करणार आहे.




# इंदिरा गोदी खासगीकरणाच्या विरोधात प्राधिकरण कार्यालयासमोर कामगारांची निदर्शने

■ मुंबई

**मुंबई** पोर्ट ट्रस्टने २१ जानेवारी रोजी मंजूर केलेल्या प्रस्तावानुसार जून महिन्यापासून इंदिरा गोदीचे दोन भाग करून ते १० वर्षांसाठी खासगी कंपन्यांना संचालन आणि देखभालीसाठी देण्यात येणार आहेत. इंदिरा गोदीच्या या खासगीकरणाला कामगारांचा विरोध आहे. पोर्ट ट्रस्टच्या विरोधात मुंबई बंदरातील सर्व कामगार संघटनांनी प्राधिकरणाच्या प्रशासकीय कार्यालयासमोर निदर्शने केली.

इंदिरा गोदीतील मालाची हाताळणी आणि गोदामाचे व्यवस्थापनाचे काम जे एम बक्षी आणि एम दिनशॉ या खासगी कंपन्यांकडे दिले जाणार आहे. या गोदीचा व्यवसाय आयात-निर्यात असून, त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा खासगी कंपन्यांकडे जाणार आहे. पोर्ट ट्रस्टला मात्र नाममात्र रॉयल्टी मिळणार आहे. केंद्र सरकारने अनेक वर्षांपासून इंदिरा गोदीत कामगार भरतीवर बंदी घातली आहे. आता माल हाताळण्यासाठी कर्मचारी उपलब्ध नाहीत, असे कारण पुढे करून गोदी खासगी कंपन्यांच्या घशात घालण्याचा डाव आहे. भविष्यात गोदीची जमीन खासगी बिल्डरांच्या घशात जाईल, अशी भीती कामगार संघटनांनी व्यक्त केली आहे.

# कुणीही संपर्क साधलेला नाही विलीनीकरण चर्चांवर सुळेंचा खुलासा

■ नागपूर

**शरद** पवार गट काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चांनी राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली असतानाच खासदार सुप्रिया सुळे यांनी या चर्चांना स्पष्ट शब्दांत फेटाळून लावले. नागपूर येथे त्यांनी सांगितले की, विलीनीकरणाबाबत आमच्याशी कुणीही संपर्क केलेला नाही. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या चर्चांमध्ये कोणतेही तथ्य नाही. सुळे म्हणाल्या की, आम्हाला याबाबत काहीच माहिती नाही. पवार साहेबांकडेही विचारणा केली. मात्र त्यांनाही कोणताही प्रस्ताव मिळालेला नाही. आमच्या पक्षातील शशिकांत शिंदे किंवा जयंत पाटील यांनी कोणताही प्रस्ताव मांडलेला नाही. आम्हालाही कोणी प्रस्ताव दिलेला नाही. आज देशाची आर्थिक, राजकीय आणि सामाजिक परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. ही राजकारण करण्याची वेळ नसून देश वाचवण्याची वेळ आहे. महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार यांसारख्या प्रश्नांवर सर्व पक्षांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे.

# राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र 'शेतकरी' दर्जा मिळणार

■ मुंबई


**राज्यातील** लाखो महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र 'शेतकरी' म्हणून वैधानिक मान्यता दिली जाणार आहे. यासाठी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

विधेयक २०२६' पावसाळी अधिवेशनात सादर करण्याची राज्य सरकारकडून तयारी सुरू असून, या कायद्यामुळे महिला शेतकऱ्यांना विविध कृषी योजनांचा लाभ थेट मिळू शकणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेत वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत या विधेयकाच्या मसुद्यावर सविस्तर चर्चा झाली.

राज्यातील कृषी क्षेत्रात महिलांचा मोठा सहभाग असूनही जमिनीची मालकी नसल्याने अनेक महिला सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. कृषी क्षेत्रात ८१ टक्क्यांहून अधिक महिलांचा प्रत्यक्ष सहभाग असल्याची माहिती आहे. मात्र, जमिनीची नोंद पुरुषांच्या नावावर असल्याने अनेक महिलांना शेतकरी म्हणून अधिकृत मान्यता मिळत नाही. परिणामी कर्ज, अनुदान, पीक विमा व अन्य शासकीय सुविधांपासून त्यांना दूर राहावे लागते.






नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

ऑफिस कामांसाठी मुलीची आवश्यकता आहे. डोंबिवली वेस्ट संपर्क **8369864046** {NC260885}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजे आकर्षक पगार (मालाड वेस्ट)- **9136731541** {NC260790}

भायखळा/ माझगांव विभागात कुरियर डिलीव्हरीसाठी कमिशन/ पगारावर मुले पाहिजे. (Daily payment) **7208841538** {NC260886}

कर्जत स्टेशनपासून अर्धा KM अंतरावर डॉक्टर दाम्पत्यास २४ तास सोबत राहणारी घरकामासाठी बाई पाहिजे. पगार 12000 ते 15,000 भोजन+ निवास मोफत आधारकार्ड आवश्यक. संपर्क- डॉ. अरुणः **9322176080** व्हाट्सॲपः **9769252629** {NC260887}

DTP ऑपरेटर्स व ऑफीस कामासाठी Tally चे ज्ञान आवश्यक महिला पुरुष तसेच पुरुष हेल्पर्स पाहिजेत त्वरीत संपर्क- विजय मोहन आर्ट, शिव मार्केट, ११वी गल्ली, अंबरनाथ (पश्चिम) भ्रमणध्वनी **9890506901** {NC260888}

वसई-मुंबई येथील मठासाठी अनुभवी आचारी पाहिजेत संपर्कः **9930607550** {NC260874}

इलेक्ट्रीशियन, वायरमेन, हेल्पर पाहिजेत इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टरसाठी संपर्क **9819642641/ 7977216214** {NC260849}

दादरमधील सुपर मार्केटसाठी दहावी पास/नापास, काऊंटर / पॅकिंग कामासाठी मुली पाहिजेत. **9821150872** {NC260895}

निवृत्त, VRS, सुशिक्षित गृहिणींसाठी उत्पन्नाची अतिरिक्त संधी + सवलती उपलब्ध.- **9653681991** {NC260921}

दादर येथे 12 तास ड्युटीसाठी Male वॉचमन / सिक्युरिटीगार्ड पाहिजेत. वय-60 च्या आत. **8879659774 / 9869278658** {NC260910}

## पाहिजेत

टुकलर ऑफसेट प्रिंटिंगसाठी फीडरमन पाहिजेत. जरीमरी, कुर्ला अंधेरीरोड. संपर्कः- **9821036458** {NC260924}

मालाड वेस्टमध्ये इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुले/मुली पाहिजे संपर्क- **9819123920.** {NC260788}

**ठाण्यातील लेडीज शोरूमसाठी**
**सेल्स गर्ल्स पाहिजेत**
ठाणे येथील एस. ए. इनामदार, या नामवंत रेडीमेड ब्लाऊज-च्या शोरूमसाठी फ्रेशर्स / अनुभवी सेल्सगर्ल पाहिजेत. (१०वी/१२वी पास) अर्जासह प्रत्यक्ष भेटा. पत्ता : चिंतामणी ज्वेलर्स शेजारी, जांभळी नाका, ठाणे. (प).
**9930198166**

स्त्री पुरुष वृद्धाश्रमात कामासाठी पाहिजे. मोफत राहण्याची खाण्याची सुविधा **7040206848** {NC260835}

भांडूप येथे सीडी मशीनसाठी फिडरमन, बॉयलर, पंचिंग ऑपरेटर, बाईंडर पाहिजे. संपर्कः **9820930362/ 9930589715** {NC260801}

**ठाणे येथील सुसंस्कृत कुटुंबास 24 तासासाठी स्वयंपाकीण बाई पाहिजे. संपर्क- 9867086273, 9987546590 {NC260933}**

१) अकाऊंट असिस्टंट पाहिजे. टॅली, वर्ड, एक्सेलचा अनुभव, वेस्टर्न भागात राहणाऱ्यांना प्राधान्य. २) हाऊसकिपिंग सुपरवायझर पाहिजे (१२ तास ड्युटी) रु. ७००/- रोज. ३) ड्रायव्हर पाहिजे. (१२ तास ड्युटी) रु.८००/- रोज. भेटाः-- रुम नं.३०, सर्वोदया ट्रस्ट बिल्डींग, गोखले रोड साऊथ, दादर (वेस्ट) {NC260930}

फळबागेत काम करण्यासाठी नेरळ जिल्हा कर्जत येथे जोडपे पाहिजे. राहणे वीज आणि पाण्याची छान व्यवस्था. पगार २०,०००/- महिना. भेटाः रूम नं. ३०, सर्वोदया ट्रस्ट बिल्डींग, गोखले रोड साऊथ, दादर (वेस्ट) {NC260929}

## पाहिजेत

दादर पश्चिम- 15-20 वर्षे अनुभवी. निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजेत. वयोमर्यादाः ४५. **9867220029/ 8080898859** {NC260935}

मुंबई आणि इगतपुरीकरिता इलेक्ट्रिशियन, हेल्पर पाहिजेत. राहण्याची खाण्याची सोय. मोबाईल- **9220848134/ 9820432190** {NC260864}

## Situation Vacant

PEON REQUIRED - ARYAN COLLEGE Jogalekarwadi, BMC School Building, Sion (E), Mumbai - 22 Contact: **24073599/ 9082654282** {NC260854}

**A Chemical Factory at Vasai East- Urgently requires 1) Male Graduate (in any discipline) to manage & coordinate day-to-day factory activities 2) Helpers (12th studied). Salary negotiable for both post. Candidates can contact on mobile- 9321630032/ 9321630011. {NC260838}**

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OT, ICU, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिटयूट, मालाड, मुंबई- **8080502190 / 8850530054** {NC260471}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260552}

## व्यवसायविषयक

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30-35 हजार कमवा दोन वर्षाचे ॲग्रीमेंट- **9028160157** {NC260906}

## वधु वर मेळावा

वधु वर मेळावा, शिबीर सर्वजाती, मुलींना फ्रि, कल्याण- **9869868620** {NC60820}

## वर पाहिजे

वधू मिनाक्षी सुर्वे वय २८ शिक्षण बारावी घरगुती विणकाम शिवण कामचे क्लासेस घेते (जन्मस्थळ- इंदापूर) नोकरदार किंवा शेतकरी वर चालेल... संपर्क **7028895882** {NC260934}

**वाचकांना सूचना**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# जयगड प्रादेशिक नळपाणी योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

■ रत्नागिरी

**जयगड** प्रादेशिक नळपाणी योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप खंडाळा पंचक्रोशी सामाजिक संस्थेने केला आहे. किमान वेतन, प्रवास भत्ता, सुरक्षितता आणि आरोग्य सुविधांसह मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी वारंवार पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नसल्याने त्यांनी २२ जूनपासून बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे.

संस्थेचे अध्यक्ष प्रथमेश गोपाळ गावणकर यांनी उपविभागीय अधिकारी जीवन देसाई रत्नागिरी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, गेल्या अनेक वर्षांपासून १४ कंत्राटी कर्मचारी या योजनेत कार्यरत असून, त्यांना किमान वेतन, प्रवास भत्ता, सुरक्षिततेच्या सुविधा आणि आरोग्य विमा यांसारख्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवले जात आहे. कामकाजाची अधिकृत नोंद, हजेरी मस्टर आणि नियोजन याबाबतही प्रशासनाकडे स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. या कर्मचाऱ्यांना १० ते १२ हजार रुपये इतक्या अत्यल्प मानधनावर काम करावे लागत आहे. त्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन व सुविधा मिळायला हव्या. रात्री-अपरात्री आणि जंगलसदृश भागातील पाणी टाक्यांवर काम करताना जीवितहानीचा धोका असल्याने सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना आणि आरोग्यविमा यांची तरतूद करण्यात यावी. यापूर्वी जिल्हा परिषद प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे आता बेमुदत आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नाही.

# लाडकी बहीण प्रमाणे आता घरकामगार महिलांना निधी

■ मुंबई

**लाडकी** बहीण योजनेच्या धर्तीवर मुंबई महापालिकेकडून असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या गरजू महिलांसाठी स्वाभिमान निधी योजना सुरू करण्याचा विचार सुरू आहे. या योजनेअंतर्गत घरकामगार, स्वयंपाकीण तसेच इतर असंघटित क्षेत्रातील महिला कामगारांना दरमहा १,५०० ते २,००० रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

या योजनेसाठी राज्य सरकारकडे मंजुरी मागण्यात आली असून, मंजुरी मिळाल्यास महापालिकेवर दरमहा सुमारे ७५ ते १०० कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिका निवडणुकीवेळी उबाठाने आपल्या जाहीरनाम्यात महिलांना आर्थिक सहाय्य देण्याच्या योजनेचा उल्लेख केला होता. निवडणुकीनंतर विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी यासंदर्भातील प्रस्ताव सभागृहनेते गणेश खणकर यांच्याकडे पाठविला होता.

# पनवेल परिसरात वीजपुरवठ्यासाठी महावितरणची तातडीची उपाययोजना

■ पनवेल

**पनवेल** परिसरातील पनवेल, कामोठे, खांदा कॉलनी, खारघर, कळंबोली व तळोजा येथील वीजपुरवठ्याच्या तक्रारी दूर करून अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणने युद्ध पातळीवर काम सुरू केले असून, उपकेंद्रांचा लोड विभागणे, नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करणे, अतिरिक्त उच्चदाब वीजवाहिनी सुरू करणे व अधिक क्षमतेच्या केबल टाकणे असे उपाय अंमलात आणण्यात येत आहेत. या उपायांमुळे पनवेल शहर व परिसरात वीज ग्राहकांना तातडीने दिलासा मिळणार आहे.

नवीनच कार्यान्वित करण्यात आलेल्या खांदेश्वर मास हौसिंग सबस्टेशनमधून खांदेश्वर स्टेशनपर्यंत लिंक लाईन चालू करून कामोठे सेक्टर ९ उपकेंद्र आणि खांदा कॉलनी उपकेंद्राचा लोड कमी करण्यात आला आहे. कामोठे येथील भगवती फिडरचा लोड कामोठे सेक्टर ९ उपकेंद्र वरून खांदा कॉलनी सबस्टेशनमधून निघणाऱ्या रेल्वे स्टेशन फिडरवर देण्यात आला. त्यामुळे कामोठे सेक्टर ९ उपकेंद्र वरील लोड कमी करण्यात मदत झाली आहे.

# ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणूक बविआचे हार्दिक राऊत भाजप पुरस्कृत

■ वसई

बहुजन विकास आघाडीचे नेते राजीव पाटील यांचे भाजपातर्फे विधान परिषदेचे गणित जुळले नाही. मात्र त्यांनी आपला भाचा माजी नगरसेवक हार्दिक राऊत यांना पुढे केले आहे. ठाणे पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत हार्दिक राऊत भाजपच्याच परिवर्तन पॅनलतर्फे निवडणूक लढवत आहेत. भाजपा-बविआच्या या नव्या समीकरणामुळे पुन्हा राजकीय तर्कवितर्क लढवले जात आहेत.

पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे बिगूल वाजले आहे. बविआचे नेते राजीव पाटील यांनी आपला भाचा हार्दिक राऊत याला भाजपाच्या पॅनलतर्फे निवडणुकीत उतरवले आहे. इतर मागासवर्गीय या मतदारसंघांतून निवडणूक लढवत आहे. या मतदारसंघात एकूण ४ हजार २१ मतदार आहेत. भाच्यामार्फत राजीव पाटील भाजपाशी सलगी साधण्याचा प्रयत्न करत आहेत. हार्दिक राऊत यांनी प्रचारासाठी भाजपा नेत्यांच्या भेटीगाठी सुरू केल्याने राजकीय चर्चा रंगल्या आहेत. बँकेच्या २१ संचालक पदांसाठी येत्या २७ जून रोजी मतदान होणार असून, २८ जूनला मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीसाठी नामांकन अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया १७ जून पर्यंत असून, आतापर्यंत १० संचालक बिनविरोध झाले आहेत. तर आता केवळ चार संचालक पदासाठी उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

# शासकीय वसतिगृहातही जातीनुसार प्रवेश!

पान १ वरून

अनुसूचित जातींच्या १३ टक्के आरक्षणाचा लाभ सर्व ५९ जातींपर्यंत समतोल पद्धतीने पोहोचविण्यासाठी न्या. अनंत बदर समितीने 'अ, ब, क, ड' अशा उपवर्गीकरणाचा अहवाल राज्य सरकारला सादर केला असला तरी या अहवालावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नसताना शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेत वर्गीकरण केल्याने वाद निर्माण झाला आहे.

हा प्रकार अत्यंत गंभीर, भेदभावपूर्ण आणि सामाजिक सलोखा बिघडविणारा असल्याचा आरोप 'युवा ग्रॅज्युएट फोरम'ने केला. या संदर्भात युवा ग्रॅज्युएट फोरमने सामाजिक न्याय विभागाच्या प्रादेशिक उपायुक्तांना निवेदन सादर करून जाहिरात व प्रवेश प्रक्रिया तत्काळ स्थगित करण्याची मागणी केली. 'युवा ग्रॅज्युएट फोरम'चे अतुल खोब्रागडे यांनी सांगितले की, भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातींना एकत्रित संवैधानिक संरक्षण दिलेले असताना अशा प्रकारे जातनिहाय विभागणी करणे सामाजिक ऐक्याला धक्का देणारे आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संधींमध्ये अशाप्रकारे भेदभावपूर्ण वर्गीकरण करणे हे सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांनाच हरताळ फासणारे आहे.

सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक समाजकल्याण उपायुक्त प्रसाद कुलकर्णी आणि सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी या जाहिरातीचे समर्थन करत म्हटले की, जाहिरातीत कोणतीही चूक नसून शासनाच्या विद्यमान परिपत्रकांनुसारच प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. १९८४, २०१४ आणि २०२५ मधील शासन निर्णयांमध्ये यासंदर्भात स्पष्ट तरतुदी असून, मागील वर्षीही याच पद्धतीने जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यामुळे यावेळी विभागाची कोणतीही वेगळी भूमिका किंवा भावना जाहिरातीमागे नाही.

# वृद्ध दिसू नये! इंजेक्शनचा शोध

पान ८ वरून

औषधांचा विशेष कोर्स दिला जातो. ही औषधे या जनुकांसाठी 'ऑन स्विच'चे काम करतात.

वैज्ञानिक पुढील सहा महिन्यांपर्यंत या रुग्णावर बारकाईने लक्ष ठेवणार आहेत. या काळात उपचाराचे परिणाम आणि दुष्परिणाम यांचे निरीक्षण केले जाईल. याआधी उंदीर आणि माकडांवर करण्यात आलेल्या चाचण्यांमध्ये या तंत्रज्ञानाने दृष्टी पुन्हा मिळवण्यात यश मिळवले होते. मानवी शरीरावरील प्रयोगातही सर्वप्रथम डोळ्याची निवड करण्यात आली. कारण तो शरीरातील तुलनेने स्वतंत्र आणि सुरक्षित अवयव मानला जातो. त्यामुळे दुष्परिणामांवर लक्ष ठेवणे अधिक सोपे होते.

लाईफ बायोसायन्सेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी जेरी मॅकलॉघलिन यांच्या मते, हा प्रयोग केवळ त्यांच्या कंपनीसाठीच नव्हे, तर संपूर्ण 'एजिंग बायोलॉजी' क्षेत्रासाठी एक महत्त्वाचा आणि परिवर्तनकारी क्षण ठरू शकतो. ही चाचणी यशस्वी ठरली, तर भविष्यात संपूर्ण शरीरातील पेशींना पुन्हा तरुण बनवण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. या संशोधनात ॲमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस, ओपनएआयचे सॅम ऑल्टमन यांच्यासह अनेक गुंतवणूकदारांनी रस दाखवला आहे. एली लिली आणि मर्कसारख्या औषध कंपन्याही गुंतवणूक वाढवत आहेत.

# रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन सुरूच! भाजपा नेत्यांकडून खिल्ली

पान १ वरून - असे म्हणत रोहित पवार आंदोलनावर ठाम राहिले. या आंदोलनाला काँग्रेसनेही पाठिंबा दिला. याप्रसंगी माध्यमांशी बोलताना रोहित पवार म्हणाले की, अन्नदात्याच्या न्यायासाठीचा हा लढा आता थांबणार नाही. सरकारने २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांपर्यंत मर्यादित लाभ, २०२५-२६ आणि २०२६-२७ या वर्षांचे पीककर्ज नियमित भरणे या अटींमुळे प्रत्यक्षात मोठ्या संख्येने शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहेत. दरम्यान, रोहित पवार यांचे वडील राजेंद्र पवार यांनी आज आंदोलनस्थळी भेट दिली.

सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आंदोलनाला स्टंटची उपमा दिली. रोहित पवार यांचा हा राजकीय स्टंट आहे. मी काहीतरी करतो हे दाखवण्यासाठी केलेला प्रयत्न आहे,असे गोरे म्हणाले. तर मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, रोहित पवार यांच्या आंदोलनाला काहीही अर्थ नाही. ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी शेतकऱ्यांना सरकार देत आहे त्यामध्ये ते श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचे सरकार होते त्यावेळी कितीवेळा कर्जमाफी झाली याबद्दल आजोबांना विचारावे. तर भाजपा नेते गोपीचंद पडळकर सोलापूर पोलिसांना उद्देशून म्हणाले की, जोपर्यंत साखर कारखान्यांनी दिलेली एफआरपी शेतकऱ्यांना मिळत नाही तोपर्यंत रोहित पवार यांनी उपोषणाला बसले पाहिजे, अन्नत्याग केला पाहिजे, सोलापूर पोलिसांना माझी विनंती आहे. रोहित पवारांना पोलीस संरक्षण द्या. त्यांना अन्नाचा एक घासही खाऊ देऊ नका.

# लॉटरी

**निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता**

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 24 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 13/06/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-01 : 6504** — ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2199 | 2782 | 3350 | 3783 | 5284 | 6799 (नाझ लॉटरी, रोहा) | 7117 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 7507 | 8159 | 9321 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0663 | 2796 | 2983 | 3597 | 4250 | 5112 | 6861 | 6891 | 9124 | 9516 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2089 | 3421 | 4417 | 5203 | 6484 | 7177 | 7829 | 8361 | 8412 | 9092 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0490 | 0916 | 1266 | 2664 | 4707 | 4911 | 5982 | 6464 | 7010 | 9415 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1429 | 2268 | 2886 | 4106 | 5063 | 6052 | 6689 | 7675 | 8354 | 8970 |
| | | 1430 | 2269 | 3233 | 4130 | 5165 | 6054 | 6767 | 7678 | 8391 | 8991 |
| 0026 | 0878 | 1571 | 2270 | 3307 | 4243 | 5263 | 6085 | 6936 | 7705 | 8442 | 9000 |
| 0042 | 0900 | 1619 | 2281 | 3325 | 4290 | 5290 | 6140 | 6949 | 7707 | 8458 | 9031 |
| 0058 | 0989 | 1698 | 2297 | 3361 | 4308 | 5304 | 6165 | 7075 | 7713 | 8471 | 9085 |
| 0148 | 1028 | 1711 | 2316 | 3386 | 4378 | 5328 | 6191 | 7077 | 7720 | 8545 | 9129 |
| 0149 | 1085 | 1713 | 2362 | 3399 | 4449 | 5420 | 6233 | 7099 | 7727 | 8570 | 9238 |
| 0164 | 1087 | 1714 | 2432 | 3523 | 4490 | 5455 | 6241 | 7100 | 7745 | 8573 | 9244 |
| 0198 | 1117 | 1863 | 2503 | 3537 | 4542 | 5456 | 6265 | 7122 | 7767 | 8635 | 9367 |
| 0247 | 1123 | 1891 | 2527 | 3543 | 4609 | 5506 | 6268 | 7181 | 7772 | 8661 | 9446 |
| 0256 | 1138 | 1937 | 2541 | 3602 | 4631 | 5540 | 6316 | 7210 | 7777 | 8698 | 9543 |
| 0280 | 1144 | 2011 | 2634 | 3694 | 4641 | 5547 | 6380 | 7213 | 7831 | 8722 | 9567 |
| 0312 | 1163 | 2027 | 2647 | 3713 | 4654 | 5553 | 6556 | 7243 | 7861 | 8758 | 9577 |
| 0367 | 1180 | 2029 | 2660 | 3765 | 4672 | 5557 | 6587 | 7248 | 7895 | 8788 | 9590 |
| 0398 | 1181 | 2067 | 2669 | 3798 | 4788 | 5615 | 6605 | 7256 | 7975 | 8809 | 9806 |
| 0406 | 1219 | 2153 | 2670 | 3833 | 4812 | 5636 | 6608 | 7376 | 8056 | 8819 | 9821 |
| 0435 | 1258 | 2156 | 2678 | 3839 | 4874 | 5704 | 6610 | 7379 | 8188 | 8821 | 9849 |
| 0570 | 1294 | 2205 | 2697 | 3967 | 4934 | 5836 | 6619 | 7472 | 8240 | 8863 | 9911 |
| 0704 | 1318 | 2221 | 2738 | 4033 | 4963 | 5843 | 6639 | 7477 | 8274 | 8864 | 9923 |
| 0768 | 1361 | 2232 | 2764 | 4040 | 4981 | 5935 | 6644 | 7490 | 8278 | 8899 | 9937 |
| 0787 | 1397 | 2244 | 2784 | 4045 | 5019 | 6008 | 6663 | 7501 | 8285 | 8922 | 9952 |
| 0800 | 1406 | 2253 | 2812 | 4048 | 5054 | 6025 | 6676 | 7579 | 8328 | 8954 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी — सोडत दर शनिवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 24 — सोडत दिनांक 13/06/2026**

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : **ML-01 : 5337**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) : **5337** — डायमंड कॉर्पोरेशन - बोरिवली

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **0499** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0541 | 2942 | 3374 | 3855 | 4329 | 4743 | 4875 | 6244 | 8457 | 9394 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0172 | 0915 | 2652 | 3774 | 4380 | 4428 | 4971 | 5451 | 5610 | 8062 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1053 | 1239 | 2230 | 4021 | 6745 | 7004 | 8841 | 9213 | 9321 | 9619 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0712 | 1493 | 4052 | 4170 | 4876 | 5021 | 5517 | 5930 | 6802 | 8452 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1070 | 1619 | 2491 | 3303 | 4115 | 4824 | 5588 | 6553 | 7272 | 7925 | 8580 | 9104 |
| | | 1090 | 1621 | 2514 | 3316 | 4116 | 4842 | 5606 | 6560 | 7276 | 7960 | 8581 | 9150 |
| | | 1095 | 1652 | 2532 | 3321 | 4140 | 4883 | 5632 | 6569 | 7280 | 7975 | 8603 | 9176 |
| | | 1101 | 1672 | 2562 | 3323 | 4166 | 4901 | 5634 | 6580 | 7287 | 7976 | 8609 | 9188 |
| | | 1114 | 1710 | 2566 | 3366 | 4186 | 4911 | 5686 | 6596 | 7307 | 7977 | 8611 | 9196 |
| 0001 | 0404 | 1115 | 1716 | 2587 | 3367 | 4209 | 4931 | 5687 | 6599 | 7334 | 7978 | 8619 | 9213 |
| 0005 | 0409 | 1119 | 1720 | 2593 | 3378 | 4230 | 4971 | 5695 | 6629 | 7337 | 8012 | 8676 | 9226 |
| 0013 | 0410 | 1126 | 1725 | 2602 | 3381 | 4242 | 4987 | 5715 | 6632 | 7357 | 8015 | 8677 | 9245 |
| 0015 | 0433 | 1140 | 1732 | 2606 | 3408 | 4322 | 4991 | 5740 | 6640 | 7403 | 8076 | 8705 | 9256 |
| 0031 | 0486 | 1152 | 1741 | 2622 | 3432 | 4325 | 5005 | 5800 | 6655 | 7405 | 8081 | 8713 | 9269 |
| 0035 | 0490 | 1161 | 1770 | 2639 | 3442 | 4334 | 5020 | 5855 | 6663 | 7435 | 8104 | 8746 | 9270 |
| 0039 | 0492 | 1167 | 1811 | 2672 | 3462 | 4359 | 5030 | 5865 | 6671 | 7450 | 8118 | 8761 | 9295 |
| 0040 | 0505 | 1172 | 1817 | 2700 | 3463 | 4396 | 5057 | 5871 | 6673 | 7461 | 8128 | 8804 | 9309 |
| 0046 | 0578 | 1174 | 1819 | 2760 | 3466 | 4414 | 5087 | 5877 | 6674 | 7470 | 8135 | 8809 | 9326 |
| 0047 | 0665 | 1187 | 1861 | 2762 | 3484 | 4421 | 5119 | 5901 | 6720 | 7474 | 8146 | 8818 | 9333 |
| 0052 | 0666 | 1189 | 1898 | 2779 | 3527 | 4453 | 5155 | 5944 | 6760 | 7479 | 8167 | 8823 | 9368 |
| 0056 | 0695 | 1190 | 1912 | 2790 | 3530 | 4462 | 5168 | 6007 | 6768 | 7566 | 8187 | 8825 | 9369 |
| 0079 | 0704 | 1192 | 1979 | 2812 | 3532 | 4477 | 5176 | 6009 | 6776 | 7598 | 8190 | 8826 | 9417 |
| 0087 | 0705 | 1196 | 2008 | 2827 | 3535 | 4487 | 5183 | 6015 | 6779 | 7599 | 8196 | 8832 | 9549 |
| 0097 | 0706 | 1212 | 2027 | 2836 | 3538 | 4497 | 5214 | 6031 | 6804 | 7639 | 8227 | 8837 | 9561 |
| 0099 | 0719 | 1221 | 2080 | 2910 | 3546 | 4532 | 5228 | 6062 | 6846 | 7678 | 8254 | 8849 | 9570 |
| 0107 | 0736 | 1232 | 2082 | 2927 | 3564 | 4542 | 5279 | 6064 | 6856 | 7693 | 8255 | 8856 | 9577 |
| 0108 | 0809 | 1271 | 2105 | 2942 | 3591 | 4544 | 5332 | 6108 | 6863 | 7699 | 8306 | 8868 | 9611 |
| 0111 | 0810 | 1275 | 2122 | 2952 | 3603 | 4595 | 5339 | 6147 | 6866 | 7701 | 8327 | 8874 | 9638 |
| 0119 | 0830 | 1307 | 2190 | 2955 | 3623 | 4596 | 5357 | 6166 | 6891 | 7703 | 8333 | 8876 | 9675 |
| 0127 | 0846 | 1324 | 2208 | 2974 | 3656 | 4614 | 5362 | 6168 | 6902 | 7714 | 8376 | 8885 | 9695 |
| 0137 | 0849 | 1331 | 2217 | 2993 | 3739 | 4618 | 5365 | 6260 | 6947 | 7718 | 8405 | 8896 | 9730 |
| 0160 | 0888 | 1355 | 2219 | 3000 | 3864 | 4633 | 5403 | 6267 | 6965 | 7719 | 8408 | 8902 | 9834 |
| 0189 | 0901 | 1358 | 2221 | 3004 | 3877 | 4634 | 5405 | 6269 | 6967 | 7735 | 8415 | 8924 | 9836 |
| 0190 | 0904 | 1366 | 2234 | 3026 | 3916 | 4640 | 5425 | 6276 | 6974 | 7740 | 8418 | 8941 | 9843 |
| 0207 | 0905 | 1372 | 2236 | 3059 | 3917 | 4644 | 5427 | 6296 | 7013 | 7743 | 8445 | 8955 | 9861 |
| 0218 | 0930 | 1388 | 2237 | 3103 | 3946 | 4685 | 5461 | 6317 | 7047 | 7767 | 8461 | 8959 | 9892 |
| 0229 | 0948 | 1391 | 2242 | 3146 | 3976 | 4692 | 5479 | 6361 | 7079 | 7775 | 8490 | 8968 | 9904 |
| 0247 | 0950 | 1411 | 2255 | 3187 | 3979 | 4695 | 5486 | 6396 | 7175 | 7779 | 8492 | 8988 | 9919 |
| 0268 | 0978 | 1413 | 2295 | 3200 | 3996 | 4697 | 5498 | 6410 | 7188 | 7784 | 8509 | 9008 | 9950 |
| 0272 | 1001 | 1514 | 2322 | 3223 | 4008 | 4720 | 5538 | 6414 | 7190 | 7787 | 8518 | 9009 | 9966 |
| 0295 | 1041 | 1524 | 2360 | 3231 | 4044 | 4734 | 5557 | 6452 | 7197 | 7798 | 8541 | 9067 | 9979 |
| 0320 | 1050 | 1550 | 2412 | 3245 | 4096 | 4776 | 5560 | 6467 | 7212 | 7867 | 8549 | 9079 | 9995 |
| 0331 | 1051 | 1604 | 2431 | 3248 | 4106 | 4804 | 5574 | 6480 | 7267 | 7872 | 8555 | 9094 | 9996 |
| 0380 | 1063 | 1612 | 2488 | 3284 | 4114 | 4818 | 5586 | 6493 | 7270 | 7887 | 8563 | 9096 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**निकाल — गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता**

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 24 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 13/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-09 : 1726**

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **9437**

तिसरे बक्षिस रु. 2000/- : **8232** — महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0185 | 1933 | 2385 | 2886 | 3723 | 4162 | 5324 | 6163 | 7602 | 9827 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2405 | 5815 | 5877 | 6299 | 6357 | 7114 | 8228 | 8909 | 9163 | 9847 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0620 | 2467 | 3676 | 7866 | 7904 | 8769 | 9317 | 9520 | 9718 | 9913 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1171 | 2215 | 3035 | 3907 | 5124 | 6064 | 6665 | 7716 | 8808 |
| | | 1179 | 2219 | 3037 | 3953 | 5225 | 6089 | 6683 | 7719 | 8838 |
| | | 1194 | 2220 | 3038 | 3958 | 5285 | 6104 | 6684 | 7776 | 8860 |
| 0077 | 0645 | 1204 | 2288 | 3103 | 4038 | 5359 | 6116 | 6806 | 7837 | 9063 |
| 0082 | 0683 | 1238 | 2321 | 3120 | 4063 | 5464 | 6126 | 6812 | 8038 | 9139 |
| 0123 | 0715 | 1397 | 2335 | 3123 | 4106 | 5469 | 6174 | 6861 | 8048 | 9159 |
| 0158 | 0720 | 1508 | 2392 | 3130 | 4130 | 5499 | 6184 | 6866 | 8118 | 9167 |
| 0182 | 0840 | 1571 | 2397 | 3201 | 4254 | 5550 | 6296 | 6880 | 8184 | 9290 |
| 0234 | 0907 | 1580 | 2427 | 3231 | 4324 | 5568 | 6313 | 6934 | 8218 | 9307 |
| 0402 | 0947 | 1678 | 2529 | 3270 | 4343 | 5585 | 6346 | 6946 | 8315 | 9408 |
| 0480 | 0949 | 1762 | 2594 | 3279 | 4353 | 5620 | 6369 | 6966 | 8338 | 9460 |
| 0483 | 1041 | 1811 | 2624 | 3321 | 4375 | 5685 | 6414 | 7044 | 8400 | 9477 |
| 0505 | 1058 | 1818 | 2752 | 3385 | 4457 | 5765 | 6415 | 7078 | 8413 | 9559 |
| 0507 | 1072 | 1871 | 2779 | 3399 | 4482 | 5772 | 6460 | 7087 | 8438 | 9591 |
| 0520 | 1075 | 1932 | 2828 | 3496 | 4527 | 5794 | 6463 | 7237 | 8463 | 9618 |
| 0557 | 1112 | 1937 | 2870 | 3603 | 4562 | 5796 | 6486 | 7357 | 8517 | 9697 |
| 0571 | 1114 | 2022 | 2901 | 3684 | 4589 | 5802 | 6544 | 7433 | 8588 | 9779 |
| 0580 | 1115 | 2026 | 2902 | 3713 | 4852 | 5845 | 6563 | 7453 | 8628 | 9909 |
| 0592 | 1144 | 2136 | 2958 | 3744 | 4919 | 5909 | 6565 | 7670 | 8702 | 9929 |
| 0600 | 1152 | 2145 | 2981 | 3883 | 4952 | 5955 | 6626 | 7678 | 8743 | 9958 |
| 0606 | 1157 | 2201 | 3023 | 3895 | 5104 | 5992 | 6634 | 7715 | 8786 | 9974 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री • प्रभालक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता**

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 24 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 13/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SP-09 : 1507**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0872 | 2394 (मेवाड एजन्सी, मुंबई) | 2873 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 2954 | 2985 | 5093 | 6104 | 7017 | 7473 | 8796 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0861 | 2606 | 3966 | 4635 | 5435 | 5720 | 6966 | 8853 | 9430 | 9503 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0482 | 1113 | 1633 | 4483 | 6278 | 6670 | 7286 | 7320 | 7705 | 9577 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1329 | 2710 | 3743 | 4434 | 5563 | 6643 | 7497 | 8207 |
| | 1336 | 2854 | 3759 | 4436 | 5586 | 6653 | 7578 | 8361 |
| 0031 | 1413 | 2935 | 3846 | 4505 | 5854 | 6661 | 7581 | 8548 |
| 0040 | 1623 | 2953 | 3874 | 4629 | 5863 | 6808 | 7711 | 8737 |
| 0075 | 1804 | 3039 | 4029 | 4825 | 6281 | 6842 | 7760 | 8882 |
| 0094 | 1863 | 3078 | 4124 | 4834 | 6404 | 6892 | 7773 | 8888 |
| 0140 | 2027 | 3139 | 4150 | 4840 | 6446 | 6968 | 7776 | 8987 |
| 0541 | 2061 | 3335 | 4224 | 4914 | 6467 | 7007 | 7839 | 9141 |
| 0728 | 2120 | 3346 | 4225 | 4943 | 6481 | 7198 | 7987 | 9178 |
| 0970 | 2272 | 3439 | 4231 | 4984 | 6509 | 7205 | 8042 | 9510 |
| 1126 | 2632 | 3563 | 4285 | 5050 | 6510 | 7276 | 8058 | 9957 |
| 1191 | 2648 | 3638 | 4296 | 5347 | 6520 | 7291 | 8083 | 9962 |
| 1215 | 2673 | 3713 | 4347 | 5509 | 6634 | 7413 | 8183 | 9967 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# जैन साधूंसाठी मुंबईमध्ये पुन्हा पांढरे पट्टे

पान १ वरून

कोंडीसंदर्भातील तक्रारींचा पाढा वाचला. जैन समुदायाकडून सार्वजनिक ठिकाणांचा वापर, पार्किंग व्यवस्थेत अडथळा याबाबत त्यांनी तक्रार केली. या तक्रारींबाबत संबंधित प्रशासनाकडे वेळोवेळी निवेदने दिल्याचेही काही नागरिकांनी सांगितले. यावेळी स्थानिक महिलांना जैन धर्मगुरूने आवाज कमी करा, असा दम दिला. त्यानंतर महिलाही संतप्त झाल्या. स्थानिकांनी आरोप केला की, जैन समाजातील काही पूजा असेल तर हे संपूर्ण रस्ता बंद करतात. कुठेही वाकड्यातिकड्या गाड्या लावतात. एकदा यांच्यामुळे एक रुग्णवाहिका अडकली होती. आराधना भवन येथे लहान मुलांची दुपारी दोन तास धार्मिक शिक्षण देणारी शाळा चालवली जाते. या नावावर धर्माचे उद्योग चालतात. यांच्याकडे आधी परवानगी नव्हती. पण नंतर दबाव आणून ती मिळवली. अनेक वेळा तक्रार केली. पण उपयोग होत नाही. सकाळी या जैन महिला रस्त्यावर मूत्र टाकतात. त्यांना आत बेसीनची सोय करून दिली आहे. तरीही त्या रस्त्यावरच मूत्र टाकतात. हे योग्य आहे का? कपडे धुतलेले पाणी, भांडी धुतलेले पाणीही रस्त्यावर टाकतात. चातुर्मासात त्यांचे साधू येतात तेव्हा सकाळपासून ढोल-ताशे वाजतात. आम्ही अनेकदा तक्रार केली, पण कुणी लक्ष देत नाही.

यावेळी येथील एका जैन नागरिकांनी सांगितले की, आम्हाला कोणालाही त्रास द्यायचा नाही. पण ह्या ठिकाणी शेवाळे तयार झाले आहे. त्यावरून पाय घसरू नये. तसेच उन्हामुळे पायाला चटके बसतात, यासाठी आम्ही हे पांढरे पट्टे मारले. यावर प्रतिक्रिया देताना संदीप देशपांडे म्हणाले की, सार्वजनिक जागांचा वापर नियमांनुसारच व्हायला हवा. यांचा धर्म यांना सांगतो का की ज्यामुळे लोकांना त्रास होईल ती गोष्ट रस्त्यावर करा. हे यांची पापं झाकण्यासाठी कबुतरांना खायला घालणार. त्याचा त्रास आम्ही सहन करायचा? रस्त्यावरची ही पांढरी पट्टी



सिम्बॉलिक आहे. आज इथे केले, उद्या तिथे करणार. हा सांस्कृतिक दहशतवाद करण्याचा प्रयत्न आहे. आमचा नमाजाला विरोध आहे तसा पट्टा मारण्याला विरोध आहे. जो कायद्याच्या विरोधात जाणार, त्याला आमचा विरोध असेल.

गेल्या काही महिन्यांपासून मुंबईत जैन समाज आणि मनसे यांच्यात विविध मुद्यांवरून वाद होत आहेत. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये घाटकोपरमधील गुजराती, मारवाडी आणि जैनबहुल गृहनिर्माण संस्थेत मांसाहार करणाऱ्या एका मराठी कुटुंबाला अपमानास्पद वागणूक देण्यात आल्याचा आरोप झाला होता. या घटनेनंतर मनसे कार्यकर्त्यांनी संबंधित सोसायटीत जाऊन याबाबत जाब विचारला होता. त्यानंतर ऑगस्ट २०२५ मध्ये दादर येथील कबुतरखान्यावरून स्थानिक नागरिक, मनसे आणि जैन समाज यांच्यात वाद झाला होता. उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार आणि आरोग्यविषयक कारणांमुळे महापालिकेने कबुतरखाना बंद करण्याची कारवाई केली होती. पण धार्मिक भावना आणि कबुतरांना खाद्य देण्याच्या परंपरेचा दाखला देत जैन समाजाने या निर्णयाला तीव्र विरोध केला होता. यावरून आंदोलनही केले होते. सध्या हा कबुतरखाना बंद आहे. काही दिवसांपूर्वी मलबार हिल परिसरातील चौकांमध्ये लावण्यात आलेले गुजराती नामफलक मनसेने आक्षेप घेतल्यानंतर महापालिकेने हटविले होते. तर गेल्या आठवड्यात सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर प्रसाद वेदपाठक याने विद्याविहार परिसरातील कैलास ॲव्हेन्यू सोसायटीमध्ये जैन धर्मगुरू आणि साध्वींच्या आगमनासाठी रस्त्यावर पांढऱ्या रंगाचे पट्टे रंगवल्याची पोस्ट टाकली होती. सोसायटीतील सर्व रहिवाशांची संमती न घेता हा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप त्याने केला होता. त्यानंतर दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोप झाले होते. अखेरीस या पट्ट्यांवर लाल-पिवळा रंग लावण्यात आला होता. मात्र, या वादात प्रसाद वेदपाठकचे इन्स्टा अकाऊंट सस्पेंड करण्यात आले होते. आता दादरमधील पट्ट्यांमुळे मराठी-जैन यांच्यातील वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे.

# घरगुती कामे करतानाही कमाई गृहिणींनी कपाळावर कॅमेरा लावायचा

पान ८ वरून

किंवा उपकरणांचा वापर करत केल्या जाणाऱ्या कामांचे व्हिडिओ चित्रीकरण करून संबंधित कंपनीला देता येईल. या कामाचे तासाचे २५० ते ३५० रुपये मानधन दिले जाते. छोट्या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचीही या प्रकारे कामाचे चित्रीकरण केल्यास अतिरिक्त कमाई होईल. हे व्हिडिओ एआयला पुरवून त्यावरून एआय प्रोग्राम तयार करतो. तो प्रोग्राम ह्युमनॉईडमध्ये बसवल्यावर ह्युमनॉईड ती सर्व कामे हुबेहुब माणसांप्रमाणे करू शकतील.

# मायक्रो ड्रामाचे वेड

**आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हाताळताना मोबाईलच्या संपूर्ण पडद्यावर उच्च दर्जाचे आणि लख्ख प्रकाशातील उभे व्हिडिओ अचानक समोर येतात. एका साध्या क्लिकवर आपल्याला एका विशिष्ट ॲप्लिकेशनवर नेऊन, सुरुवातीचे काही भाग मोफत दाखवून पुढील भागांसाठी पैशांची मागणी करणाऱ्या या छोट्या व्हिडिओ मालिका म्हणजेच मायक्रो ड्रामा होय. अवघ्या ५० सेकंदांचे हे भाग प्रेक्षकांना असे काही खिळवून ठेवतात की, चुकूनही ते स्क्रोल करणे शक्य होत नाही. हे केवळ साधे मनोरंजन नसून मनोरंजन विश्वाची व्याख्या बदलणारा एक प्रचंड मोठा प्रवाह ठरत आहे. आजकालच्या प्रेक्षकांकडे मोठा चित्रपट पाहण्यासाठी वेळ किंवा संयम नसतो. प्रवासात, ऑफिसच्या ब्रेकदरम्यान किंवा अगदी ५ मिनिटांच्या मोकळ्या वेळात हे एपिसोड्स सहज पाहता येतात.**





अंजली महाजन

या मायक्रो ड्रामाची खरी सुरुवात चीनमधून झाली असून, तिथे याला दुआनजू असे म्हटले जाते. सन २०१८ मध्ये चीनमधील आशय निर्मात्यांनी मोबाईलच्या उभ्या पडद्याचा कौशल्याने वापर करून छोट्या भागांची मिनी सीरिज तयार करण्याचा अनोखा प्रयोग केला. जेव्हा जगातील इतर देशांमधील तरुण पिढी केवळ डान्स व्हिडिओ आणि रील्स बनवण्यात व्यस्त होती, तेव्हा चीनमध्ये या नव्या माध्यमाचा व्यावसायिक पाया रचला जात होता. उत्कंठावर्धक वळणे, रोमान्स आणि तीव्र भावनांचा मेळ असलेल्या या कथा कोरोना महामारीच्या काळात कमालीच्या लोकप्रिय झाल्या. रीलशॉर्ट नावाच्या एका चिनी ॲपला अमेरिकेत एका टप्प्यावर नेटफ्लिक्सपेक्षाही अधिक डाऊनलोड्स मिळाले होते. आज जगातील सुमारे दहा टक्के लोकसंख्या हे मायक्रो ड्रामा नियमितपणे पाहत आहे. या नव्या प्रवाहाने आता हॉलिवूडसारख्या जगातील सर्वात मोठ्या चित्रपटसृष्टीलाही गंभीर विचार करायला भाग पाडले आहे. फॉक्स एंटरटेनमेंट सारखी मातब्बर निर्मिती संस्था आगामी दोन वर्षांत दोनशेहून अधिक मायक्रो ड्रामा मालिका बनवण्याच्या मोठ्या योजनेवर काम करत आहे. पारंपारिक वेब सीरिजच्या तुलनेत या मायक्रो ड्रामाचा निर्मिती खर्च अत्यंत कमी असतो. जिथे नेटफ्लिक्सच्या स्ट्रेंजर थिंग्स सारख्या अत्यंत लोकप्रिय मालिकेच्या एकाच भागासाठी सुमारे सहा कोटी डॉलर्स खर्च होतात, तिथे मायक्रो ड्रामाची संपूर्ण मालिका अवघ्या एक ते तीन लाख डॉलर्समध्ये तयार होते. कमी खर्चात जास्त परतावा देणारे हे गणित जागतिक पातळीवर निर्मात्यांना आकर्षित करत आहे.

तज्ज्ञांच्या मते, या मायक्रो ड्रामाच्या अफाट लोकप्रियतेचे मुख्य कारण त्याची हूक डेन्सिटी हे आहे. याचा अर्थ असा की, प्रत्येक काही सेकंदांनंतर प्रेक्षकांसमोर असा काही प्रसंग, रहस्य किंवा भावनिक वळण सादर केले जाते, ज्यामुळे त्याची उत्सुकता सर्वोच्च पातळीवर टिकून राहते. चीनमध्ये लोकप्रिय ठरलेल्या ऑनलाईन कादंबऱ्यांमधील श्रीमंत सीईओ, कौटुंबिक वाद किंवा बदल्याच्या कथांचा अभ्यास करून, वाचकांच्या प्रतिसादानुसार या मालिकांचे लेखन केले जाते. यामध्ये प्रामुख्याने महिला प्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या भावनिक विषयांची भरमार असते. इतकेच नव्हे तर, चीनमधील काही बड्या कंपन्या आता या मालिकांमध्ये मानवी कलाकारांऐवजी ८० टक्क्यांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेचा म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून निर्मिती खर्च आणखी कमी करत आहेत.

भारतातही हा बाजार अत्यंत वेगाने विस्तारत असून भारतीय प्रेक्षकांच्या मानसिकतेचा यात मोठा वाटा आहे. लुमीकायच्या ताज्या अहवालानुसार, भारतातील मायक्रो ड्रामाची बाजारपेठ केवळ एका वर्षात २५०० ते २८०० कोटी रुपयांच्या घरात पोहोचली आहे. भारतात आधीच इन्स्टाग्राम रील्स आणि युट्यूब शॉर्ट्स पाहणारा ४० कोटींहून अधिक मोठा वर्ग तयार आहे. महागड्या ओटीटी वर्गणीच्या तुलनेत कमी खर्चात आणि कमी वेळेत वेगवान मनोरंजन देणारा हा पर्याय भारतीय प्रेक्षकांना प्रचंड भावत आहे. चीनमध्ये हा उद्योग २०३० पर्यंत तो १६ अब्ज डॉलर्सचा टप्पा पार करेल, असा अंदाज आहे. भारतात २०२५ मध्ये सर्वाधिक डाऊनलोड केल्या गेलेल्या टॉप ५ व्हिडिओ स्ट्रीमिंग ॲप्सपैकी ३ ॲप्स हे मायक्रो ड्रामा प्लॅटफॉर्म्स (उदा. कुकू टीव्ही, स्टोरी टीव्ही, क्विक टीव्ही) होते. भारतीय मायक्रो ड्रामा बाजारपेठ २०३० पर्यंत ४.५ अब्ज डॉलर्स (सुमारे ३९ हजार कोटी रुपये) होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या क्षेत्रातून महसूल मिळवण्यासाठी सध्या प्रामुख्याने चार प्रकारच्या व्यावसायिक पद्धती वापरल्या जात आहेत. पहिल्या प्रकारात जाहिरात प्रारूप येते, ज्यामध्ये प्रेक्षक संपूर्ण आशय मोफत पाहतात आणि दरम्यान त्यांना जाहिराती दाखवल्या जातात. दुसऱ्या प्रकारात वर्गणी प्रारूप येते, ज्यामध्ये ग्राहकांकडून मासिक किंवा वार्षिक शुल्क आकारले जाते. तिसरे प्रारूप हे फ्रीमियम स्वरूपाचे असते, ज्यामध्ये काही सुरुवातीचे भाग मोफत तर उर्वरित महत्त्वाचे भाग पाहण्यासाठी पैसे मोजावे लागतात. चौथ्या प्रकारात प्रति-भाग पेमेन्ट पद्धत असते, ज्यामध्ये पुढील प्रत्येक नवीन भाग अनलॉक करण्यासाठी स्वतंत्रपणे लहान रक्कम द्यावी लागते. भारतात सध्या डिस्नी प्लस हॉटस्टार सारख्या मुख्य प्रवाहातील मंचांवर तडकासारखे प्रयोग केले जात आहेत, तर कुकू एफएम आणि स्टोरीमॅक्स सारखे आघाडीचे मंच याच प्रकारच्या प्रभावी कथाकथनावर काम करत आहेत.

**>>> रविवार विशेष**

त्यामुळे मोबाईलच्या पडद्यावर दिसणारे हे छोटे व्हिडिओ केवळ करमणुकीचे साधन नसून, मनोरंजन विश्वाला कायमचे बदलून टाकणारा अब्जावधी रुपयांचा एक नवा जागतिक व्यवसाय ठरत आहेत. हा नवा प्रवाह पारंपरिक दूरचित्रवाणी वाहिन्या आणि मोठ्या ओटीटी मंचांच्या अस्तित्वाला थेट आव्हान देत आहे. आजचा प्रेक्षक टीव्ही समोरील ठराविक वेळेत बसून राहण्याऐवजी स्वतःच्या वेळेनुसार मनोरंजन निवडत आहे. यामुळे पारंपरिक जाहिरातदार आता आपला मोर्चा या छोट्या आणि उभ्या पडद्यावरील मालिकांकडे वळवत आहेत. कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याचा हा सर्वात प्रभावी मार्ग ठरत आहे. भविष्यात या मायक्रो ड्रामामध्ये प्रेक्षकांना स्वतः कथेचा मार्ग निवडण्याची सोय असणारे इंटरॲक्टिव्ह पर्याय उपलब्ध करून दिले जाणार आहेत, ज्यामुळे प्रेक्षक केवळ एक प्रेक्षक न राहता कथेचा एक भाग बनेल आणि यातूनच मनोरंजनाची एक संपूर्ण नवीन परिसंस्था निर्माण होईल यात शंका नाही.

# कॉर्पोरेट पारदर्शकतेला भगदाड?

**भारतीय भांडवली बाजाराच्या इतिहासात काही नावे केवळ कंपन्यांची राहत नाहीत, तर ती एका काळाची प्रतीके बनतात. एकेकाळी हर्षद मेहता हा शेअर बाजारातील चमत्काराचा चेहरा मानला जात होता. सत्यम कॉम्प्युटर्सचे रामलिंगा राजू हे भारतीय माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील यशाचे प्रतीक समजले जात होते. आयएल अँड एफएस, डीएचएफएल यांसारख्या संस्थाही आर्थिक सामर्थ्याचे उदाहरण म्हणून मिरवल्या जात होत्या. मात्र आकड्यांच्या चकाकीमागील वास्तव उघड होताच या यशोगाथांचे रूपांतर आर्थिक व्यवस्थेला हादरा देणाऱ्या प्रकरणांत झाले. राजेश एक्स्पोर्ट्सभोवती निर्माण झालेल्या वादानेही अशाच आठवणींना उजाळा दिला आहे. तपासाचा अंतिम निष्कर्ष अद्याप यायचा असला, तरी या प्रकरणाने भारतीय कॉर्पोरेट व्यवस्थेतील काही मूलभूत प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणले आहेत.**

विशेष म्हणजे या प्रकरणातील आरोपांची व्याप्तीच थक्क करणारी आहे. १५.१५ लाख कोटी रुपयांहून अधिक महसूल संशयाच्या भोवऱ्यात सापडणे ही साधी बाब नाही. अनेक राज्यांच्या वार्षिक अर्थसंकल्पापेक्षाही मोठ्या रकमेबाबत प्रश्न उपस्थित होत असतील, तर तो केवळ एका कंपनीचा विषय राहत नाही. तो देशातील कॉर्पोरेट गव्हर्नन्स, लेखापरीक्षण व्यवस्था आणि नियामक यंत्रणांच्या विश्वासार्हतेशी जोडला जातो. एखाद्या सूचीबद्ध कंपनीचे आर्थिक विवरण हे लाखो गुंतवणूकदारांसाठी निर्णयाचा पाया असते. त्या पायातच तडे दिसू लागले, तर संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर परिणाम होतो. या प्रकरणाने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की, भांडवली बाजारात महसूल आणि बाजारमूल्य यांचा मोह अनेकदा वास्तवावर पडदा टाकतो. एखाद्या कंपनीचा महसूल झपाट्याने वाढत




असेल, तिचा जागतिक विस्तार होत असेल किंवा ती परदेशातील नामांकित कंपन्यांचे अधिग्रहण करत असेल, तर बाजार तिच्याकडे आकर्षित होतो. राजेश एक्स्पोर्ट्सबाबतही असेच घडले. स्वित्झर्लंडमधील व्हॅलकॅम्बीचे अधिग्रहण आणि जागतिक सुवर्ण उद्योगातील वाढते स्थान यामुळे कंपनीची प्रतिमा एका महत्त्वाकांक्षी भारतीय बहुराष्ट्रीय कंपनीची बनली. मात्र इतिहास सांगतो की, अनेक वेळा सर्वाधिक चमकदार यशोगाथांमागेच सर्वाधिक कठीण प्रश्न दडलेले असतात.


**विनिता शाह**

याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे परदेशातील उपकंपन्यांचे जाळे. जागतिकीकरणाच्या युगात भारतीय कंपन्या जगभर विस्तारत आहेत. हे आर्थिकदृष्ट्या आवश्यक आणि स्वागतार्हही आहे. मात्र विविध देशांतील उपकंपन्या, त्यांच्यातील व्यवहार, कररचना आणि निधीचे प्रवाह यामुळे आर्थिक व्यवहारांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे बनते. अशा परिस्थितीत महसूल प्रत्यक्ष व्यवहारातून आला आहे की, केवळ कागदोपत्री नोंदींमधून, हे तपासणे अधिक अवघड होते. जगभरातील अनेक आर्थिक घोटाळ्यांमध्ये शेल कंपन्या, संबंधित पक्षांतील व्यवहार आणि परदेशातील उपकंपन्यांचा वापर झाल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे या प्रकरणाने भारतातील नियामक यंत्रणांना नव्या प्रकारच्या देखरेखीची गरज असल्याचे स्पष्ट केले आहे. या वादामुळे लेखापरीक्षण व्यवस्थेलाही कठघऱ्यात उभे केले आहे. एखाद्या कंपनीच्या आर्थिक अहवालावर लेखापरीक्षकांची शिक्कामोर्तब असते. त्यावर आधारित राहून गुंतवणूकदार, बँका, विमा कंपन्या आणि वित्तीय संस्था निर्णय घेत असतात. जर हजारो कोटी रुपयांच्या व्यवहारांबाबत नंतर गंभीर प्रश्न उपस्थित होत असतील, तर लेखापरीक्षण प्रक्रियेची परिणामकारकता तपासणे अपरिहार्य ठरते. ऑडिट ही केवळ कायदेशीर औपचारिकता नसून गुंतवणूकदारांच्या विश्वासाची पहिली हमी असते. त्यामुळे या प्रकरणातून ऑडिट क्षेत्रातील उत्तरदायित्व आणि गुणवत्तेबाबत नव्याने चर्चा सुरू होणे स्वाभाविक आहे. नियामक संस्थांच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित होतात. एखाद्या भागधारकाच्या तक्रारीनंतर चौकशी सुरू होणे ही सकारात्मक बाब असली, तरी इतक्या मोठ्या प्रमाणातील कथित व्यवहारांबाबत आधी इशारे का मिळाले नाहीत, हा प्रश्न उपस्थित होतो. आज कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण आणि डिजिटल निरीक्षणाची साधने उपलब्ध आहेत. अशा काळात संशयास्पद व्यवहारांचे नमुने लवकर ओळखण्यासाठी नियामक संस्थांकडे अधिक सक्षम तंत्रज्ञान असणे आवश्यक आहे. कारण आर्थिक गैरव्यवहार जितक्या लवकर उघडकीस येतात, तितके गुंतवणूकदारांचे नुकसान कमी होते. या प्रकरणातून किरकोळ गुंतवणूकदारांसाठीही महत्त्वाचा धडा मिळतो. भारतात शेअर बाजारात नव्याने प्रवेश करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. अनेक गुंतवणूकदार केवळ महसूल वाढ, नफ्यातील झेप किंवा समभागांच्या तेजीवर भर देतात. मात्र अनुभवी गुंतवणूकदार कंपनीचा रोख प्रवाह, थकित येणी, कर्जाची स्थिती, प्रवर्तकांची विश्वासार्हता आणि कॉर्पोरेट प्रशासन यांनाही तितकेच महत्त्व देतात. केवळ वाढत्या आकड्यांवर आधारित गुंतवणूक निर्णय किती धोकादायक ठरू शकतात, याची आठवण हे प्रकरण करून देते. या घडामोडींचा परिणाम केवळ एका कंपनीपुरता मर्यादित राहत नाही. एलआयसीसारख्या संस्थात्मक गुंतवणूकदारांची गुंतवणूक अशा कंपन्यांमध्ये असते. म्हणजेच लाखो नागरिकांच्या बचतीचा आणि विमा निधीचाही अप्रत्यक्ष संबंध या घटनांशी जोडला जातो. परिणामी कॉर्पोरेट गव्हर्नन्स हा केवळ उद्योगजगताचा विषय राहत नाही; तो सर्वसामान्यांच्या आर्थिक सुरक्षिततेशी संबंधित प्रश्न बनतो. राजेश मेहता आणि राजेश एक्स्पोर्ट्स यांच्यावरील आरोप सिद्ध होतील किंवा खोडून निघतील, हे येणारा काळ ठरवेल. मात्र या प्रकरणाने एक गोष्ट निर्विवादपणे स्पष्ट केली आहे.

# संकटवर्तुळात ममता



**विधानसभा निवडणूक निकालांमधील पराभवानंतर पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस पक्षात उफाळून आलेले बंडाचे वादळ आणि पक्षाला सोडचिठ्ठी देणारी लाट थांबता थांबत नाहीये. गेल्या २८ वर्षांत पहिल्यांदा ममता बॅनर्जींपुढे अशा प्रकारचे संकट उभे राहिले आहे. या संकटातून मार्ग काढण्यासाठी काँग्रेस पक्षामध्ये तृणमूलचे विलीनीकरण करण्याच्या चर्चा पुढे येत आहेत. पण ही बाबदेखील वाटते तितकी सोपी नसून प्रचंड कायदेशीर व राजकीय गुंतागुंतीची आहे. कारण पश्चिम बंगाल विधानसभा विरोधी पक्षनेते रीताब्रत बॅनर्जी यांनी स्वतःचा गटच 'खरा तृणमूल काँग्रेस' असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात शिवसेना व राष्ट्रवादीबाबत जे घडले त्याचीच पुनरावृत्ती पश्चिम बंगालमध्ये घडण्याची शक्यता आहे.**


डॉ. जयदेवी पवार

पश्चिम बंगालच्या राजकारणात सध्या अभूतपूर्व घडामोडी घडत आहेत. एकेकाळी काँग्रेसविरोधातून जन्माला आलेल्या तृणमूल काँग्रेसच्या भवितव्याबाबत आता उलट चर्चा सुरू आहे. पक्षप्रमुख ममता बॅनर्जी आपल्या पक्षाचे काँग्रेसमध्ये विलिनीकरण करू शकतात, अशा चर्चांनी राजकीय वातावरण तापले आहे. मात्र हा प्रश्न केवळ राजकीय नाही; तो घटनात्मक, कायदेशीर आणि संघटनात्मक गुंतागुंतींनी वेढलेला आहे. त्यामुळे हे विलिनीकरण केवळ ममता बॅनर्जी यांच्या इच्छेवर अवलंबून नसून अनेक अटी आणि मर्यादांमधून मार्ग काढावा लागणार आहे.

या संपूर्ण घडामोडीचे वैशिष्ट्य म्हणजे इतिहासाची झालेली पुनरावृत्ती. ममता बॅनर्जी यांच्या राजकीय कारकिर्दीचा श्रीगणेशा काँग्रेसमधूनच झाला होता. १९७० आणि १९८० च्या दशकात त्या काँग्रेसच्या आक्रमक युवा नेत्या म्हणून उदयास आल्या. मात्र पश्चिम बंगालमध्ये डाव्या पक्षांविरुद्ध काँग्रेस पुरेशी संघर्षशील भूमिका घेत नसल्याची त्यांची भावना होती. त्यातूनच १९९७ मध्ये त्यांनी काँग्रेसविरोधात बंड पुकारले आणि १ जानेवारी १९९८ रोजी अखिल भारतीय तृणमूल काँग्रेसची स्थापना केली. पुढील दशकभर त्यांनी डाव्या आघाडीविरुद्ध संघर्ष उभारला आणि अखेर २०११ मध्ये ३४ वर्षांची डाव्यांची सत्ता उलथवून टाकली. काँग्रेसच्या कथित नरम भूमिकेला विरोध म्हणून निर्माण झालेला पक्ष आज पुन्हा काँग्रेसच्या छत्राखाली जाण्याच्या विचारात आहे, हा दुर्दैवी योगायोग म्हणावा लागेल. परंतु यामध्ये राजकीय इच्छेपेक्षा मोठा अडथळा म्हणजे संविधानातील दहावी अनुसूची.

१९८५ मध्ये राजीव गांधी सरकारने लागू केलेला पक्षांतरविरोधी कायदा भारतीय राजकारणातील 'आया राम गया राम' संस्कृतीला आळा घालण्यासाठी आणण्यात आला होता. या कायद्यानुसार एखादा आमदार किंवा खासदार आपल्या पक्षाचा त्याग करून दुसऱ्या पक्षात गेल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होऊ शकते. मात्र पक्ष विलिनीकरणाच्या बाबतीत एक विशेष तरतूद ठेवण्यात आली आहे. त्यानुसार मूळ पक्षातील किमान दोन तृतीयांश म्हणजेच ६६.६ टक्के लोकप्रतिनिधींनी विलिनीकरणाला पाठिंबा दिला तर ते कायदेशीर मानले जाते. याच ठिकाणी ममता बॅनर्जी यांच्यासमोरील सर्वात मोठे आव्हान उभे राहते. तृणमूल काँग्रेसचे विधानसभा आणि संसदेतील सर्व सदस्य विलिनीकरणाला पाठिंबा देतील, याची खात्री नाही. जर दोन तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा मिळाला नाही, तर काँग्रेसमध्ये जाणाऱ्या आमदार-खासदारांवर पक्षांतरविरोधी कायद्याची कारवाई होऊ शकते. त्यामुळे कोणतेही विलिनीकरण करण्यापूर्वी आवश्यक संख्याबळ उभे करणे अत्यावश्यक ठरेल.

या प्रश्नात आणखी गुंतागुंत निर्माण करणारा मुद्दा म्हणजे पक्षातील बंडखोर गट. पश्चिम बंगाल विधानसभा विरोधी पक्षनेते रीताब्रत बॅनर्जी यांनी स्वतःचा गटच 'खरा तृणमूल काँग्रेस' असल्याचा दावा केला आहे. त्यांच्या मते, बहुसंख्य आमदार आणि लक्षणीय संख्येने खासदार त्यांच्या बाजूने आहेत. त्यांनी काँग्रेसमध्ये विलिनीकरणाची शक्यता पूर्णपणे फेटाळून लावली असून, तृणमूलची मूळ ओळख कायम ठेवण्याचा दावा केला आहे. अशा परिस्थितीत हा वाद थेट निवडणूक आयोगापर्यंत पोहोचू शकतो. पक्षात फूट पडल्यास आणि दोन्ही गटांनी मूळ पक्षावर दावा केल्यास निवडणूक आयोगाला हस्तक्षेप करावा लागतो. आयोग अशा वेळी तीन बाबींचा विचार करतो. पहिली म्हणजे आमदार आणि खासदारांमधील बहुमत कोणाकडे आहे. दुसरी म्हणजे पक्षाची संघटनात्मक रचना, राष्ट्रीय पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि स्थानिक नेतृत्व कोणाच्या बाजूने आहे. तिसरी बाब म्हणजे पक्षाच्या संविधानातील नियमांचे पालन झाले आहे की नाही. महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या विभाजनाच्या प्रकरणांत निवडणूक आयोगाने याच निकषांवर निर्णय दिले होते. एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेना आणि अजित पवार यांच्या गटाला राष्ट्रवादी काँग्रेसची अधिकृत ओळख मिळाली. त्यामुळे तृणमूलमध्येही अशीच परिस्थिती निर्माण झाल्यास पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह गोठवले जाऊ शकते किंवा बंडखोर गटाला दिले जाऊ शकते.तिसरे आणि कदाचित सर्वात महत्त्वाचे आव्हान म्हणजे संघटनात्मक वास्तव. तृणमूल काँग्रेसची संपूर्ण राजकीय ओळख काँग्रेस आणि डाव्या पक्षांविरोधातील संघर्षातून तयार झाली आहे. गेली अनेक दशके तळागाळातील कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधी राजकारण केले आहे. अशा कार्यकर्त्यांना अचानक काँग्रेससोबत काम करण्यास प्रवृत्त करणे सोपे नाही. नेतृत्वाने निर्णय घेतला तरी कार्यकर्त्यांमध्ये असंतोष, गोंधळ आणि मोठ्या प्रमाणावर फूट पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रीताब्रत बॅनर्जी यांचा दावा आहे की त्यांच्या गटाकडे आधीच ६४ हून अधिक आमदारांचा पाठिंबा आहे आणि ही संख्या आणखी वाढू शकते. तसेच अनेक खासदारही त्यांच्या बाजूने आहेत. जर हा दावा वास्तवाच्या जवळचा असेल, तर ममता बॅनर्जी यांच्यासाठी आवश्यक दोन तृतीयांश बहुमत मिळवणे अत्यंत कठीण ठरू शकते. दुसरीकडे बंडखोर खासदारांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पाठिंबा देण्याचे संकेत दिल्याने परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाली आहे.

या सर्व घडामोडी पाहता तृणमूल काँग्रेस आज आपल्या २८ वर्षांच्या इतिहासातील सर्वात मोठ्या संकटाचा सामना करत असल्याचे दिसते. एकीकडे ममता बॅनर्जी यांचे राष्ट्रीय राजकारणातील स्थान, काँग्रेसशी वाढती जवळीक आणि भविष्यातील राजकीय समीकरणे आहेत; तर दुसरीकडे पक्षाचे अस्तित्व, निवडणूक चिन्ह, संघटनात्मक एकता आणि आमदार-खासदारांची निष्ठा यांचे प्रश्न आहेत. त्यामुळे तृणमूलचे काँग्रेसमध्ये विलिनीकरण हा केवळ एका पक्षाचा निर्णय राहिलेला नाही; तो भारतीय राजकारणातील सर्वात गुंतागुंतीच्या घटनात्मक आणि राजकीय संघर्षांपैकी एक बनला आहे. पुढील काही आठवड्यांत या संघर्षाची दिशा स्पष्ट होईल. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की, पश्चिम बंगालच्या राजकारणात आता मोठे बदल अपरिहार्य दिसत आहेत.

पश्चिम बंगालच्या राजकारणात यापूर्वीही पक्षफुटीची अनेक उदाहरणे पाहायला मिळाली आहेत. एकेकाळी डाव्या आघाडीने जवळपास ३४ वर्षे राज्यावर वर्चस्व राखले होते. मात्र सत्तेचा दीर्घकालीन वापर, संघटनात्मक जडत्व आणि नेतृत्वावरील वाढता असंतोष यामुळे त्यांची पकड सैल होत गेली. त्याच असंतोषाचा फायदा घेत ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेसची उभारणी केली आणि डाव्यांचे अभेद्य मानले जाणारे गड उद्ध्वस्त केले. आता इतिहासाचे चक्र पुन्हा फिरताना दिसत आहे. ज्या तृणमूलने इतर पक्षांच्या विघटनाचा राजकीय लाभ घेतला, त्याच पक्षाला आज अंतर्गत असंतोष, नेतृत्वावरील प्रश्नचिन्हे आणि उत्तराधिकारी निवडीच्या वादांचा सामना करावा लागत आहे.

या संकटाचा राष्ट्रीय राजकारणावरही परिणाम होऊ शकतो. २०२४ नंतरच्या काळात विरोधी पक्षांच्या राजकारणात तृणमूल काँग्रेस महत्त्वाची शक्ती राहिली आहे. लोकसभेत पक्षाचे अस्तित्व आणि पश्चिम बंगालमधील त्याचा प्रभाव हा काँग्रेससह इतर विरोधी पक्षांसाठी महत्त्वाचा घटक आहे. जर तृणमूलमध्ये मोठी फूट पडली किंवा पक्षाचे काँग्रेसमध्ये विलिनीकरण झाले, तर विरोधी राजकारणाची संपूर्ण रचना बदलू शकते. काँग्रेसला पूर्व भारतात नवे बळ मिळू शकते, तर दुसरीकडे भाजपालाही विरोधकांच्या मतविभाजनाचा फायदा मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे हा संघर्ष केवळ बंगालपुरता मर्यादित नसून त्याचे पडसाद दिल्लीच्या सत्ताकेंद्रापर्यंत उमटू शकतात. यातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे नेतृत्वाचा प्रश्न. तृणमूल काँग्रेस हा पारंपरिक अर्थाने संस्थात्मक पक्ष नसून तो मोठ्या प्रमाणावर ममता बॅनर्जी यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती उभा राहिलेला राजकीय पक्ष मानला जातो. गेल्या दोन दशकांत पक्षाची प्रत्येक मोठी निवडणूक, प्रत्येक राजकीय लढाई आणि प्रत्येक धोरणात्मक निर्णय ममता यांच्या नेतृत्वाखालीच पार पडला आहे. मात्र कोणत्याही पक्षासाठी व्यक्तिकेंद्री राजकारणाची मर्यादा असते. पक्षामध्ये दुसऱ्या फळीचे नेतृत्व कितपत सक्षम आहे, उत्तराधिकाराची प्रक्रिया कितपत स्पष्ट आहे आणि संघटना नेतृत्वापेक्षा मोठी बनली आहे का, हे प्रश्न अशा संकटकाळात अधिक तीव्रतेने समोर येतात. सध्या उपलब्ध माहिती, बंडखोर नेत्यांचे दावे आणि काँग्रेसशी सुरू असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेस एका निर्णायक वळणावर उभी आहे. पक्षाचे भवितव्य काँग्रेसमध्ये विलीन होण्यात आहे की स्वतंत्र अस्तित्व टिकवण्यात, याचा निर्णय केवळ राजकीय गणितांवर होणार नाही. तो आमदार-खासदारांच्या निष्ठेवर, कार्यकर्त्यांच्या भूमिकेवर, निवडणूक आयोगाच्या निर्णयांवर आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे बंगालच्या जनतेच्या प्रतिसादावर अवलंबून असेल. मात्र इतके निश्चित आहे की, पुढील काही महिने पश्चिम बंगालच्या राजकारणासाठी ऐतिहासिक ठरणार आहेत. यातून उभे राहणारे नवे समीकरण भारतीय राजकारणाची दिशा बदलू शकते.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# वाढत्या रक्तदानाबरोबर संशोधनही हवे

व्यक्ती, समाज किंवा जगाच्या पाठीवरच्या वेगवेगळ्या देशांना एकत्र बांधून ठेवण्यासाठी माणूसकी हाच गुणधर्म महत्त्वपूर्ण ठरतो. आणि ही माणूसकी जिवंत ठेवण्याकरीता रक्ताचं नातं हे तितकीच मोठी भूमिका बजावत असतं. आपल्याकडे रक्ताचं नातं म्हणजे एकाच कुटुंबातले किंवा नातेसंबंध असे मानले जाते. परंतु व्यापक अर्थाने विचार केला तर माणसाला माणसासारखं वागवलं जाणं आणि माणूसकीची मूल्य जपली जाणं खूप महत्त्वाचं ठरतं. प्रत्येक माणसाला जगण्यासाठी रक्त हा घटक महत्त्वाचा ठरतो. स्वतःच्या हृदयाला शुद्ध रक्ताचा पुरवठा जितका आवश्यक आहे तितकाच एका माणसाने केलेले रक्तदान हे तीन जणांचे प्राण वाचवणारे ठरते. रक्तदानाचे हे महत्त्व व्यक्ती आणि समाजाला सातत्याने लक्षात आणून देण्याकरीता दरवर्षी १४ जून हा दिवस जागतिक रक्तदान दिवस म्हणून पाळला जातो. कार्ल लँडस्टायनर या वैज्ञानिकाने ब्लड ग्रूपचे संशोधन केले आणि त्याच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने जागतिक आरोग्य संघटनेने हा दिवस जागतिक रक्तदान दिवस म्हणून घोषित केला. त्यामागचा उद्देश प्रामुख्याने रक्त ही मानवी जीवनाची किती मूलभूत प्रेरणा आहे हे लक्षात आणून देण्याचा प्रयत्न होत असतो. मनुष्याच्या शरीरामध्ये रोज नवीन रक्त तयार होते आणि हे रक्ताभिसरण अधिक चांगल्या पद्धतीने होत राहावे. यासाठी शालेय स्तरावर जरी यंत्रणा काम करत असली तरीसुद्धा आपल्या शरीरातलं अतिरिक्त रक्त इतरांचे रोग बरे करण्यासाठी किंवा त्यांना जीवनदान देण्यासाठी उपयोगात आणू शकतो. वयाच्या साठ वर्षांपर्यंत तीन महिन्यांतून एकदा तरी रक्तदान करावे असे मानले जाते. जगभर रक्तदान ही संकल्पना खूप लोकप्रिय झालेली आहे. प्रामुख्याने रक्तदानातून आपण कोणाच्या तरी उपयोगी आलो, अशी भावना निर्माण होतेच. शिवाय माणूसकीचं नातं या रक्तदानातून अधिक भक्कम होतं. जागतिक रक्तदानाच्यानिमित्ताने आरोग्य आणि एकमेकांसाठी सहाय्यभूत होण्याविषयी केली जाणारी जनजागृती निश्चितच महत्त्वपूर्ण ठरते.

### वाढणाऱ्या रोगांची संख्या

विशेष म्हणजे बदलत्या काळानुसार ज्या प्रमाणात वेगवेगळे रोग, आजार, व्याधी निर्माण होत आहेत किंवा त्याचे प्रमाण वाढते आहे या सगळ्यांतून लोकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली. वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक प्रकारची संशोधनंही झाली. आधुनिक उपकरणांचा वापर सुरू झाला. मोठमोठ्या शस्त्रक्रिया काही तासांमध्ये पूर्ण होऊ लागल्या आहेत. परंतु हे सगळे होत असताना कोणत्याही मोठ्या शस्त्रक्रियेसाठी अतिरिक्त रक्त आवश्यक ठरत गेले. अगदी गंभीर परिस्थितीमध्ये रुग्णाचे प्राण वाचवायचे असतील तर त्यासाठी तातडीने रक्तपुरवठा होणे अत्यंत गरजेचे ठरले. अगदी भारतासारख्या मोठी लोकसंख्या असलेल्या देशात गेल्या काही वर्षांत रस्ते अपघातांचे प्रमाण वाढले. आणि त्यात दरवर्षी लाख-दीड लाख लोकांचे जीव जातात. आणि अशा रस्ते अपघातात गंभीर जखमी झालेल्यांना तातडीने रक्त उपलब्ध होणे तितकेच महत्त्वाचे ठरते. दुर्दैवाने अजून तशा प्रकारची तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध होत नाही आणि या हलगर्जीपणाने लाखो लोकांचे प्राण जातात. आज देशभरात रक्तसाठा भरपूर उपलब्ध होतो. रक्तदात्यांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. त्या तुलनेमध्ये रक्ताचे अधिक शास्त्रीय पद्धतीने संकलन करून त्याचा योग्य पद्धतीने उपयोग करणे तितकेच मोठे आव्हान ठरते आहे. शास्त्रीय पद्धतीने रक्तसंकलन करणे त्यातले काही घटक वेगळे करून त्या त्या विशिष्ट रोगांसाठी उपयोगात आणणे या गोष्टी होऊ लागल्या आहेत. तरीदेखील एकूण संकलित रक्तावर प्रक्रिया करून ते अधिकाधिक टिकवण्याचा प्रयत्न अपेक्षेप्रमाणे यशस्वी झालेला नाही. आज जरी रक्तदानाविषयी जनजागृती करून लोकांना रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. तरीदेखील जमा होणाऱ्या या अतिरिक्त रक्तसाठ्याची शास्त्रीय पद्धतीने देखभाल करणे अनेक ठिकाणी शक्य होत नाही. खरे तर बदलत्या काळानुसार आणि नवनवीन संशोधनानुसार जमा होणाऱ्या या रक्तसंपत्तीचे तितकेच गांभीर्याने संरक्षण करणे गरजेचे ठरते. अनेक रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया करण्याची व्यवस्था असते. पण संबंधित रुग्णाला तिथे तातडीने रक्त उपलब्ध होईल याची खात्री नसते. अगदी ऐनवेळेला रुग्णांच्या नातेवाईकांना रक्त मिळवण्यासाठी धावपळ करण्याचीही वेळ येत असते.

### जागतिक स्तरावर संशोधन

जागतिक स्तरावर रक्त संकलन आणि त्याच्यावरचे संशोधन खूप पुढे गेलेले आहे. त्यामानाने भारत त्याच स्तरावर पोहोचलेला नाही. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालाप्रमाणे रक्तातल्या गुठळ्या विरघळवणे, प्लाझ्मावर आधारित औषधांची निर्मिती करणे, रक्ताचा कॅन्सर असणाऱ्यांसाठी अधिक वेगळी उपाययोजना करणे, यामध्ये बरेच संशोधन झालेले आहे. एवढेच नव्हे तर एमएमए नावाचा नवीन रक्तगटही शोधला गेलेला आहे. जो दुर्मीळ रक्तगट मानला जातो. अमेरिकन सोसायटी ऑफ एमेटॉलॉजी या संस्थेच्या आवारामध्ये हा रक्तगट म्हणजे पन्नास वर्षांपूर्वीचे गूढ उकलण्याचा दावा केला गेला आहे. यातला महत्त्वाचा भाग असा आहे की, भारतासारख्या देशात मधुमेहाचे प्रमाण प्रचंड वाढते आहे. आणि असा मधुमेह असलेल्यांना रक्तदान करता येत नाही. म्हणूनच भारतासारख्या देशाने रक्तसंकलन आणि रक्तसंशोधन यावर विशेष लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता आहे. बदलत्या काळानुसार बदलणाऱ्या जीवनशैलीतून निर्माण होणाऱ्या व्याधी आणि अशा व्याधीग्रस्तांसाठी उपयुक्त ठरणारे रक्त यावरही संशोधन झाले पाहिजे. आज रक्तदान करणाऱ्यांची संख्या भरपूर आहे. काहीवेळेला तर रक्त नको म्हणून सांगण्याची वेळ येते. केवळ रक्तपेढ्या म्हणजे ब्लडबँकांची संख्या वाढवून चालणार नाही. तर याच रक्तपेढ्यांमधून रक्तावरील संशोधनाला प्रोत्साहन देण्याची वेळ आलेली आहे. आजचा हा जागतिक रक्तदान दिन मानवतेचा धर्म जागवणारा आहे. तसाच तो रक्तदानातून जग जगवणाराही म्हटला पाहिजे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

पद तात्पुरतं असतं, नाव आणि प्रतिष्ठेलाही मर्यादा असतात. पण तुम्ही लोकांशी कसं वागलात, ते कायम लक्षात ठेवतात.

## पंचांग



**रविवार, १४ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ कृष्ण चतुर्दशी**
**नक्षत्र : रोहणी**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० वृषभ**

**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-१६**

**दर्श अमावास्या; अमावास्या प्रारंभ दुपारी १२.२०**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

# बोंबील बटाटा मसाला



★ **साहित्य :-** ४ जणांसाठी, ४ मोठे ताजे बोंबील, २ बटाट्याचे गोल काप, १ कांदा बारीक चिरून १/२ वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, १ वाटी खवलेले खोबरे, ३ हिरव्या मिरच्या बारीक चिरून, ८-१० लसणीच्या पाकळ्या बारीक चिरून, २ टे. स्पून लसूण, मिरची कोथिंबीर पेस्ट, २ टे. स्पून चिंचेचा कोळ, १/२ चमचा हळद, २ टीस्पून तिखट चवीनुसार मीठ, १/४ वाटी तेल

★ **कृती :-** प्रथम बोंबील चिरून स्वच्छ धुवून त्याचे तुकडे करून घेतले. नंतर त्यात हळद, तिखट, मीठ, आलं, लसूण मिरचीची पेस्ट चोळून घेतले. नंतर त्यातच बटाट्याचे काप, ओले खोबरे, लसूण, मिरची व कोथिंबीर घालून सर्व एकजीव करून घेतले एक तासासाठी मॅरिनेट करून ठेवले. नंतर एका पसरट भांड्यात २ टे. स्पून तेल घालून त्यात कांदा पसरवला व त्यात फक्त मॅरिनेटेड बटाटे घातले व ५ मिनिटे शिजू दिले. नंतर त्यावर बोंबील लावून घेतले व शेवटी उरलेले खोबरं, कोथिंबीर पसरवले व त्यावर ४ टे. स्पून तेल पसरवले आणि १० मिनिटे वाफेवर शिजू दिले. चमचमीत रसदार बोंबील बटाटा खाण्यासाठी तयार झाले.

## क्रीडा

# यजमानी अमेरिकेची धडाकेबाज सुरुवात

## फोलारिनचे २ गोल! पॅराग्वेला ४-१ ने नमवले

**सहयजमान अमेरिकेने फिफा विश्वचषकाच्या आपल्या सलामीच्या सामन्यात पॅराग्वेला ४-१ ने पराभूत करून एक उत्कृष्ट कामगिरी केली. लॉस एंजेलिसमध्ये झालेल्या या सामन्यात फोलारिन बालोगुनने शानदार कामगिरी करत अमेरिकेसाठी दोन गोल केले. संघाने सुरुवातीपासून शेवटपर्यंत वर्चस्व गाजवले आणि एकतर्फी विजय मिळवला. या सामन्यात अमेरिकेने विश्वचषकाच्या इतिहासातील आपली सर्वोत्तम कामगिरी केली.**



■ लॉस एंजेलिस

**या** सामन्याच्या पहिल्या हाफमध्ये डॅमियन बोबाडिलाने ७व्या मिनिटालाच गोल करून अमेरिकेला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर फोलारिनने आपली जादू दाखवली. त्याने प्रथम ३१ व्या मिनिटाला पॅराग्वेच्या गोलपोस्टला चेंडू मारला आणि नंतर पहिल्या हाफच्या अतिरिक्त वेळेत गोल केला. अशाप्रकारे पहिल्या हाफपर्यंत अमेरिकेने ३-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या हाफमध्ये मॉरिसिओने ७३ व्या मिनिटाला गोल करून स्कोअर ३-१ असा केला. त्यानंतर अमेरिकेने आपला आक्रमकपणा वाढवला आणि पुन्हा एकदा पॅराग्वेच्या बचावात घुसण्याचा प्रयत्न केला. निर्धारित ९० मिनिटे पूर्ण झाल्यानंतर सात मिनिटांचा अतिरिक्त वेळ देण्यात आला. पॅराग्वेने पूर्ण प्रयत्न सुरू ठेवले, त्याउलट अमेरिकेने आक्रमण सुरूच ठेवले आणि पॅराग्वेच्या बचावात घुसण्यात यश मिळवले.

अंतिम शिट्टी वाजण्याच्या काही सेकंदांपूर्वीच जिओव्हानी रेनाने अमेरिकेसाठी गोल करून संघाला ४-१ अशी आघाडी मिळवून दिली. अशाप्रकारे अमेरिकेने या सामन्यात एक दणदणीत विजय नोंदवला. परिणामी अमेरिकेने विश्वचषकाच्या 'ड' गटात ३ गुणांसह पहिले स्थान पटकाविले.

**सोमवार १५ जूनचे सामने**

| भारतीय वेळ | संघ | ठिकाण |
|---|---|---|
| १.३० पहाटे | नेदरलँड्स विरुद्ध जपान | आर्लिंग्टन |
| ४.३० पहाटे | आयव्हरी कोस्ट विरुद्ध इक्वाडोर | फिलाडेल्फिया |
| ७.३० सकाळी | स्वीडन विरुद्ध ट्युनिशिया | ग्वाडालाहारा |
| ९.३० रात्री | स्पेन विरुद्ध केप व्हर्डे | अटलांटा |

# ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्य फेरीत भारताच्या पी. व्ही. सिंधूचा पराभव

■ सिडनी



**भारताची** दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू आज ऑस्ट्रेलियन बॅडमिंटन ओपनच्या उपांत्य फेरीत जपानच्या अव्वल मानांकित अकाने यामागुचीकडून सरळ गेममध्ये २०-२२, १२-२१ ने पराभूत झाली. त्यामुळे या भारतीय खेळाडूची बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनच्या विजेतेपदाची प्रतीक्षा कायम राहिली आहे.

पहिल्या गेममध्ये सिंधूने यामागुचीच्या प्रत्येक शॉटचा धैर्याने सामना केला. दोन्ही खेळाडूंनी सलग सहा गुण मिळवले. परंतु सिंधूला आपला गेम पॉइंट गुणांमध्ये रूपांतरित करता आला नाही. यामागुचीने आपला संयम राखला आणि पहिला गेम जिंकला. पण दुसऱ्या गेममध्ये खेळाचे चित्र पूर्णपणे पालटले. यामागुचीने सलग ८ गुण मिळवून १३-६ अशी आघाडी घेतली आणि संपूर्ण गेममध्ये आपले वर्चस्व कायम ठेवत सामना सहज जिंकला. आता यामागुची महिला एकेरीच्या विजेतेपदाच्या सामन्यात थायलंडच्या पोर्नपावी चोचुवोंगचा सामना करेल.

# भारताचा अफगाणिस्तानवर ७ विकेट राखून विजय

■ धर्मशाला

**धर्मशालामध्ये** आज झालेल्या तीन एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने अफगाणिस्तानवर ७ विकेट आणि १३ चेंडू शिल्लक राखून विजय मिळवला. पावसामुळे उशिराने हा सामना २५-२५ षटकांचा खेळवण्यात आला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. सलामीवीर रहमानुल्लाह गुरबाजने ५१ चेंडूंत १०२ धावा केल्यामुळे अफगाणिस्तानने २४.५ षटकांत सर्वबाद १९४ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात कर्णधार शुभमन गिलच्या नाबाद ८४ धावांच्या बळावर भारताने २२.५ षटकांत १९५ धावा ठोकल्या. भारताच्या गुरनूर ब्रारने पदार्पणातच ३ गडी बाद केले. रोहित शर्माने १६ चेंडूंत १६ धावा, ईशान किशनने २१ चेंडूंत ३४ धावा व श्रेयस अय्यरने १० चेंडूंत ७ धावा, के. एल. राहुलने १९ चेंडूंत नाबाद ३९ धावा केल्या.

# बोस्निया-हर्झेगोविना व कॅनडात सामना १-१ ने बरोबरीत सुटला

■ टोरांटो



**टोरोंटो** येथे झालेला फिफा विश्वचषक स्पर्धेच्या 'ब' गटातील पहिला सामना बोस्निया-हर्झेगोविना आणि कॅनडा संघात १-१ ने बरोबरीत सुटला. जोवो लुसिचच्या गोलमुळे बोस्निया-हर्झेगोविनाने पहिल्या हाफमध्ये आघाडी घेतली होती. परंतु कॅनडाने दुसऱ्या हाफमध्ये जोरदार पुनरागमन केले आणि ७८ व्या मिनिटाला साईल लॅरिनने गोल करून सामना १-१ असा बरोबरीत सोडवला. ज्यामुळे दोन्ही संघांना गुणतालिकेत एक-एक गुण मिळाला.

पहिल्या हाफमध्ये बोस्निया-हर्झेगोविनाच्या जोवो लुकिचने २१ व्या मिनिटाला गोल करून आपल्या संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. हा त्याचा पहिला आंतरराष्ट्रीय गोलही होता. त्यानंतर स्निया-हर्झेगोविना आत्मविश्वासाने खेळला आणि कॅनडाला बरोबरी साधू दिली नाही. गोल करणारा खेळाडू लुकिचला पहिल्या हाफमध्ये अतिरिक्त वेळेत पिवळे कार्डही मिळाले. सततच्या व्यत्ययांमुळे पंचांनी ५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला. ज्यानंतर मध्यंतरापर्यंत बोस्निया-हर्झेगोविना १-० ने आघाडीवर होता. मध्यंतरानंतर कॅनडाने आक्रमक पवित्रा घेतला आणि अखेरीस ७८ व्या मिनिटाला बदली खेळाडू साईल लॅरिनने एक शानदार गोल करून स्कोअर १-१ असा बरोबर केला. लॅरिनच्या गोलने सामन्याची दिशाच बदलली आणि कॅनडाने जिंकण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. नियोजित ९० मिनिटांनंतर सहा मिनिटांचा अतिरिक्त वेळ देण्यात आला. दोन्ही संघांनी विजयी गोल करण्याचा प्रयत्न केला. परंतु थकवा आणि भक्कम बचावामुळे कोणत्याही संघाला निर्णायक आघाडी घेता आली नाही. अखेरीस सामना १-१ असा बरोबरीत संपला.

**अनुसूची-१ फॉर्म ए**
**जाहीर घोषणा**
*(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)*
**एक्सेल ओव्हरसीज प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **एक्सेल ओव्हरसीज प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | २७.०१.१९९२ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | आरओसी - मुंबई १ |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U36910MH1992PTC065058 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | जीडब्ल्यू-६१४०, भारत डायमंड बोर्स, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१, महाराष्ट्र, भारत |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | १०.०६.२०२६ |
| ७. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | ०७.१२.२०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | **महेश चांद गुप्ता** नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P01489/2018-19/12304 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ता:- एफई-२०२, सॉल्ट लेक सिटी, सेक्टर-३, १ला मजला, कोलकाता-७००१०६. ईमेल : mcgupta90@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल | पत्ता: सी/ओ एमकेपीएस अँड असोसिएट्स एलएलपी युनिट ५०१, ५वा मजला, द समिट बिझनेस पार्क, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००६९ ईमेल : cirp.excel2026@gmail.com |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | **२४.०६.२०२६** |
| १२. | कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग | लागू नाही |
| १३. | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | वेबलिंक : https://ibbi.gov.in/home/downloads वास्तविक पत्ता: लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने **एक्सेल ओव्हरसीज प्रायव्हेट लिमिटेड**च्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेला १०.०६.२०२६ रोजी सुरू करण्याचा आदेश दिला आहे.
**एक्सेल ओव्हरसीज प्रायव्हेट लिमिटेड**च्या धनकोंना येथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यांसह **२४.०६.२०२६** रोजी किंवा त्यापूर्वी बाब क्र.९ किंवा १० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.
नोंद क्र. १२ समोर सूचीबद्ध केलेल्या वर्गातील आर्थिक धनकोने, फॉर्म सीए- लागू नाही मध्ये, नोंद क्र. १३ समोर सूचीबद्ध केलेल्या तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून, त्या वर्गाचा अधिकृत प्रतिनिधी (वर्ग निर्दिष्ट करा) म्हणून काम करण्यासाठी आपल्या पसंतीच्या अधिकृत प्रतिनिधीची निवड दर्शवावी.
**दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.**

**दिनांक: १३.०६.२०२६**
**ठिकाण: कोलकाता**

**महेश चांद गुप्ता**
**अंतरिम ठराव व्यावसायिक**
**एक्सेल ओव्हरसीज प्रायव्हेट लिमिटेडच्या सीआयआरपीच्या बाबतीत**
नोंद पत्ता-एफई-२०२, सॉल्ट लेक सिटी, सेक्टर-३, १ला मजला, कोलकाता-७००१०६.
नोंदणी ईमेल-mcgupta90@gmail.com
नोंदणी क्र. IBBI/IPA-001/IP-P01489/2018-2019/12304
एएफए क्र.: AA1/12304/02/300627/109025 वैधता – ३०.०६.२०२७ पर्यंत

**फॉर्म ए**
**जाहीर घोषणा**
*(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)*
**तिरूमल्ला ग्राउंडनट्स इंडस्ट्रिज इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **तिरूमल्ला ग्राउंडनट्स इंडस्ट्रिज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | **२ सप्टेंबर, २०१६** |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | आरओसी मुंबई २ |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र. / मर्यादित दायित्व ओळख क्र. | U15100MH2016PTC285467 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | कार्यालय क्र.१२०९, १२ वा मजला, दि पॅसिफिक, प्लॉट क्र.२२९ सेक्टर १३, खारघर, नवी मुंबई, रायगड, पनवेल, महाराष्ट्र, भारत, ४१०२१० |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | **१२ जून २०२६** |
| ७. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | **०९ डिसेंबर २०२६** |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | **रितेश आर. महाजन** आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPA-002/IP-N00048/2017-18/10132 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | बी-२०३, देवगिरी, गणेशमाळा सिंहगड रोड, पुणे, महाराष्ट्र, ४११०३० ईमेल : ritesh@riteshmahajan.in |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल | बी-२०३, देवगिरी, गणेशमाळा सिंहगड रोड, पुणे, महाराष्ट्र, ४११०३० ईमेल : tgiipl.cirp@gmail.com |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | **२६ जून २०२६** |
| १२. | कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग | या टप्प्यावर धनकोंचा कोणताही वर्ग निश्चित करता आला नाही. |
| १३. | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | वेबलिंक : https://ibbi.gov.in/home/downloads वास्तविक पत्ता: अ.क्र.१० अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे. लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने **मे. तिरूमल्ला ग्राउंडनट्स इंडस्ट्रिज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**च्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेला **१२ जून २०२६** रोजी सुरू करण्याचा आदेश दिला आहे.
**मे. तिरूमल्ला ग्राउंडनट्स इंडस्ट्रिज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**च्या धनकोंना येथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यांसह **२६ जून २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी बाब क्र. १० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.
नोंद क्र. १२ समोर सूचीबद्ध केलेल्या वर्गातील आर्थिक धनकोने, फॉर्म सीए- लागू नाही मध्ये, नोंद क्र. १३ समोर सूचीबद्ध केलेल्या तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून, त्या वर्गाचा अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी आपल्या पसंतीच्या अधिकृत प्रतिनिधीची निवड दर्शवावी.
**दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.**

**सही/- रितेश आर महाजन**
**अंतरिम ठराव व्यावसायिक**
**तिरूमल्ला ग्राउंडनट्स इंडस्ट्रिज इंडिया प्रायव्हेट लिमिटेडकरिता**
IBBI/IPA-002/IP-N00048/2017-18/10132
**एएफए वैधता – ३१.१२.२०२६ पर्यंत**

**दिनांक: १४ जून २०२६**
**ठिकाण: पुणे**

# सहारनपुरात दहशतवाद्यांच्या संपर्कात असलेल्या तरुणाला अटक

■ भोपाळ

**उत्तर** प्रदेशच्या सहारनपूर जिल्ह्यातील नानौता परिसरातून सुरक्षा यंत्रणांनी तरुणाला अटक केली. त्याचा मोबाईल फोन आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. भोपाळ एटीएस, यूपी एटीएस, मेरठ एसटीएफ आणि आयबी यांनी एकत्रितपणे ही मोठी कारवाई केली.

एटीएस भोपाळचे अधिकारी राहुल कुमार शर्मा यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेली ही कारवाई एका मोठ्या देशव्यापी धाडीचा भाग असून, त्याच्यावर पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या संपर्कात असण्याचा संशय आहे. एटीएसच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, भोपाळमध्ये दाखल झालेल्या देशद्रोहाच्या एका प्रकरणाच्या तपासादरम्यान या तरुणाचे नाव समोर आले. त्या संदर्भात, सहारनपूरच्या तरुणाला सहआरोपी मानून त्याच्यावर कारवाई करण्यात आली. तपास यंत्रणांची ही कारवाई भोपाळमध्ये अटक करण्यात आलेल्या मोहम्मद फराजच्या प्रकरणाशी जोडली जात आहे.

# १२ वीच्या गुणांवर वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश द्यावा

■ नवी दिल्ली



**नुकत्याच** झालेल्या नीती आयोगाच्या ११ व्या बैठकीत

**तामिळनाडू मुख्यमंत्र्यांची सूचना**

तामिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी नीट परीक्षेवर कडाडून टीका केली. एमबीबीएस, बीडीएस आणि आयुष अभ्यासक्रमांसाठी नीटऐवजी १२ वीच्या गुणांवर आधारित प्रवेश द्यावेत, अशी सूचना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत केली. नीट परीक्षा सुरू झाल्यापासून समाजातील वंचित घटकातील विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे नीट परीक्षा रद्द करावी, अशी मागणीसुध्दा मुख्यमंत्री विजय यांनी केली.

देश विदेश

# कोमामध्ये असलेल्या थायलंडच्या राजकुमारी बज्रकितियाभाचे निधन

■ बँकॉक



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**थायलंडचे** राजे महा वजिरालोंगकॉर्न यांची थोरली कन्या आणि सिंहासनाच्या संभाव्य वारसदारांपैकी एक मानल्या जाणाऱ्या राजकुमारी बज्रकितियाभा नरेन्दिरा देब्यावती यांचे निधन झाले आहे. त्या गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ कोमामध्ये होत्या. वयाच्या ४७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतल्याची अधिकृत घोषणा थायलंडच्या राजघराण्याकडून करण्यात आली.

राजघराण्याने जारी केलेल्या निवेदनानुसार, बँकॉक येथील किंग चुलालोंगकोर्न मेमोरियल हॉस्पिटलमध्ये स्थानिक वेळेनुसार सायंकाळी ७.४८ वाजता त्यांचे निधन झाले. गेल्या काही वर्षांपासून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते. मात्र, डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतरही त्यांच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा झाली नाही.

डिसेंबर २०२२ मध्ये आपल्या पाळीव कुत्र्यांना व्यायाम देत असताना राजकुमारी अचानक कोसळल्या होत्या. डॉक्टरांच्या तपासणीत मायकोप्लाझ्मा संसर्गामुळे त्यांच्या हृदयाचे ठोके अनियमित झाले होते. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्या कोमामध्ये गेल्या आणि त्यानंतर पुन्हा शुद्धीवर येऊ शकल्या नव्हत्या.

# दक्षिण कोरियाचे माजी राष्ट्राध्यक्ष यून येओल यांना ३० वर्षांची शिक्षा

■ सोल

**उत्तर** कोरियाच्या प्योंगयांगमध्ये लष्करी ड्रोन पाठवून तणाव निर्माण केल्याप्रकरणी दक्षिण कोरियाचे माजी राष्ट्राध्यक्ष यून सुक येओल यांना सोल जिल्हा न्यायालयाने ३० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांनी स्वतःच्या देशात मार्शल लॉ घोषित करण्यासाठी हा बनाव रचल्याचे न्यायालयाने म्हटले.

येओलसह माजी संरक्षण मंत्री किम योंग-ह्यून, डिफेन्स काउंटर इंटेलिजन्स कमांडचे माजी प्रमुख यो इन-ह्युंग आणि ड्रोन ऑपरेशन कमांडचे माजी प्रमुख किम योंग-डे यांना देशद्रोह आणि सत्तेचा गैरवापर केल्याबद्दल न्यायालयाने दोषी ठरवले. न्यायालयाने म्हटले की,



या अधिकाऱ्यांनी लष्करी कारवाईच्या नावाखाली उत्तर कोरियाला चिथावले. त्यामुळे दोन्ही देशांत लष्करी संघर्षाचा धोका वाढला. ही कारवाई येओल यांच्या निर्देशानुसार झाली होती. त्यांना अपेक्षा होती की, उत्तर कोरिया प्रत्युत्तर देईल. ही योजना डिसेंबर २०२४ मध्ये मार्शल लॉ लागू करण्याच्या तयारीचा भाग होती. त्यांनी ३ डिसेंबरला मार्शल लॉ लागू करताना म्हटले होते की, राष्ट्रविरोधी शक्तींपासून वाचवण्याची गरज आहे, परंतु मोठ्या जनविरोधानंतर त्यांना निर्णय मागे घ्यावा लागला.

# पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाची आजपासून काटकसरीची योजना मागे

■ इस्लामाबाद

**पाकिस्तानच्या** सर्वोच्च न्यायालयाने आपल्या काटकसरीची योजना उद्या १५ जूनपासून मागे घेण्याचा निर्णय घेतला. याबाबतचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश याहया आफ्रिदी यांनी दिले. इंधन बचतीसाठी न्यायालयांमध्ये आठवड्यातून ४ दिवसच (सोमवार ते गुरुवार) काम चालत होते. ते आता पूर्ववत सुरू होणार आहे.

न्यायालयातील वाहनांसाठीचे ५० टक्के इंधन कपातीचे निर्बंध मागे घेण्यात आले. सर्व प्रशासकीय आणि कामकाजाची प्रक्रिया कोणत्याही कपातीशिवाय पूर्वीसारखीच सुरळीतपणे चालू राहील. सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राष्ट्रीय न्यायिक धोरण निर्मिती समितीच्या ६० व्या बैठकीत पेशावर आणि लाहोर उच्च न्यायालयाच्या प्रस्तावांवर विचार करण्यात आला, ज्यामध्ये जिल्हा न्यायव्यवस्थेत दर आठवड्याला ३ सुट्ट्या देण्याच्या धोरणावर पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली होती. परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर समितीने जिल्हा न्यायालयांना पुन्हा ६ दिवसीय कामकाजाच्या आठवड्यावर परत जाण्याची परवानगी दिली.

# दिल्लीतील तो शापित बंगला अखेर पाडून नव्याने बांधणार

■ नवी दिल्ली

३३, शामनाथ मार्ग हा दिल्लीतील प्रशस्त बंगला अखेर जमीनदोस्त करण्यात येणार आहे. अनेक वर्षांपासून हा बंगला शापित म्हणून कुप्रसिद्ध आहे.

या बंगल्यात वास्तव्यास येणारे काही राजकीय नेते आणि नोकरशहांच्या जीवनात अनेक अप्रिय घटना घडल्या आहेत. त्यामुळे या बंगल्याची शापित अशी ओळख बनली आहे. कोणीही या बंगल्यात राहायला तयार नव्हते.



अखेर हा शापित बंगला पूर्णपणे जमीनदोस्त करून त्या जागी दिल्ली आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्यालय उभारण्याची योजना दिल्ली सरकारने आखली आहे.

त्यामुळे गेली कित्येक वर्षे अत्यंत कमी वापर झालेली ही वास्तु नव्या आणि आधुनिक यंत्रणा आणि सोयी-सुविधांसह प्राधिकरणाचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी गजबजून जाणार आहे.

# युरिया खरेदीसाठी सातबारा सक्ती रद्द कृषी मंत्र्यांच्या हस्तक्षेपानंतर निर्णय

■ अकोला

**युरिया** खरेदीसाठी सातबारा उतारा आणि आधार कार्ड यांसारखी कागदपत्रे अनिवार्य करण्याचा निर्णय अखेर मागे घेण्यात आला आहे. कृषी सेवा केंद्रांबाहेर शेतकऱ्यांच्या वाढत्या रांगा आणि होत असलेल्या गैरसोयींची दखल घेत कृषी मंत्र्यांनी हस्तक्षेप केल्यानंतर अकोल्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी यासंदर्भातील जाचक अटी रद्द केल्या आहेत.



युरिया खरेदीतील गैरप्रकार रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी खत खरेदीसाठी सातबारा अनिवार्य करण्याचे आदेश दिले होते. मात्र या निर्णयानंतरही कृषी केंद्रांबाहेर पहाटे तीन वाजल्यापासून शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा कायम होत्या. विशेष म्हणजे बटाईने शेती करणारे आणि सातबारा उपलब्ध नसलेले अनेक शेतकरी खत खरेदीपासून वंचित राहत असल्याच्या तक्रारी आल्या होत्या. त्यानंतर कृषी मंत्र्यांनी खत खरेदीसाठी सातबारा मागणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिला. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी रात्री उशिरा नवीन आदेश जारी करत खत खरेदीसाठी सातबारा आणि अन्य ओळखपत्रांची सक्ती रद्द केली. या निर्णयानंतर पुन्हा एकदा कृषी सेवा केंद्रांसमोर युरिया आणि डीएपी खतासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे खत उपलब्धता आणि वितरण व्यवस्थेबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. खरिपाच्या हंगामासाठी खत मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रीपासूनच कृषी सेवा केंद्रांबाहेर थांबावे लागत होते.

# अर्थखाते फडणवीसांकडेच ठीक राऊतांनी राष्ट्रवादीला डिवचले

■ मुंबई

**अर्थ** खात्याची जबाबदारी पेलवू शकेल असा एकही मंत्री सध्या महायुतीच्या सरकारमध्ये नाही. त्यामुळे तूर्त अर्थ खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच ठेवणे शहाणपणाचे ठरेल, असे म्हणत शिवसेना उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी आज सकाळच्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादीला डिवचले. त्यांच्या या वक्तव्यावर महायुतीच्या नेत्यांनी टीका केली.

माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्याकडे असलेले अर्थखाते राष्ट्रवादीलाच मिळाले पाहिजे, असा आग्रह अनेक दिवसांपासून राष्ट्रवादीचे सुनील तटकरे आणि छगन भुजबळ आदि नेत्यांनी धरला. मात्र फडणवीस यांनी याबाबत काहीही भाष्य केलेले नाही. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या नेत्यांना डिवचण्यासाठी संजय राऊत यांनी हे विधान केले. राऊतांच्या या वक्तव्यावर छगन भुजबळ यांनी, आता महायुतीचे खातेवाटप संजय राऊत यांना विचारुनच करावे लागेल. असा उपरोधिक टोला लगावला.

# धारावीतील शाहूनगरच्या रहिवाशांचे स्थलांतर सुरू

**तात्पुरत्या संक्रमण शिबिरात हलवणार**

■ मुंबई

**धारावी** पुनर्विकास प्रकल्पांतर्गत शाहू नगरमधील ९०० रहिवाशांच्या स्थलांतराची प्रक्रिया पालिकेने सुरू केली.पात्र रहिवाशांना जागेसाठी नोटिसा पाठवण्यात आल्या असून, कायमस्वरूपी घरे मिळेपर्यंत त्यांना चांगल्या सुविधांसह संक्रमण शिबिरात हलवले जाणार आहे किंवा त्यांना घरभाडे दिले जाणार आहे.

या स्थलांतर प्रक्रियेतील पॅकेजनुसार, येथील पात्र रहिवाशांना २७५ चौरस फुटांपर्यंतच्या घरांसाठी दरमहा २२,००० रुपये, तर ३७५ चौरस फुटांच्या घरांसाठी दरमहा ३०,००० रुपये घरभाडे दिले जाईल.हा भत्ता दरवर्षी ५ टक्क्यांनी वाढणार आहे. सर्व कुटुंबांना घर सोडताना एकावेळी १५,००० रुपयांचे सहाय्य दिले जाईल. कायमस्वरूपी पुनर्वसनामध्ये रहिवाशांना मिळणारे घर किमान ५०० चौरस फुटांचे किंवा सध्याच्या क्षेत्राच्या १.३५ पट जास्त असेल. हे घर ५ वर्षांच्या आत दिले जाईल. तात्पुरत्या निवासासाठी दिली जाणारी घरे विद्यमान घरांपेक्षा अधिक प्रशस्त आणि उत्तम दर्जाची आहेत.

# मुंबईच्या महापौर रितू तावडे यांची म्हाडा मुख्यालयास सदिच्छा भेट

■ मुंबई

**मुंबईच्या** महापौर रितू तावडे यांनी आज महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांची वांद्रे (पूर्व) येथील म्हाडा मुख्यालयात सदिच्छा भेट घेतली. यावेळी विविध नागरी विषयांबरोबरच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर म्हाडामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा झाली.



बैठकी दरम्यान महापौर तावडे यांनी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत अतिधोकादायक उपकरप्राप्त इमारतींमध्ये राहणाऱ्या भाडेकरू व रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती जाणून घेतली. विशेषतः संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी अशा इमारतींतील रहिवाशांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमा, समन्वय यंत्रणा तसेच जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत संजीव जयस्वाल यांनी त्यांना माहिती दिली.

**जाहीर सूचना**

जनतेच्या माहितीकरिता याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते की, श्री. सदाशिव विष्णू दिक्षित हे एम.व्ही. पांडलोसकर मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०००५७ येथे स्थित मनोहर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या ३ ऱ्या मजल्यावर स्थित सदनिका क्र. ३०३ व त्यासह सदर संस्थेद्वारे पारित भाग प्रमाणपत्र क्र. १६ अंतर्गत समाविष्ट पाच पूर्णतः भरणा केलेले समभाग क्र. ७६ ते ८० (सदर सदनिका आणि सदर समभाग यापश्चात एकत्रितरित्या 'सदर मालमत्ता' असे उल्लेखित) चे संपूर्ण आणि निःसंशय मालक होते.

सदर श्री. सदाशिव विष्णू दिक्षित यांचे दि. ०७.१०.२०१९ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात (i) श्रीमती अपर्णा सदाशिव दिक्षित (पत्नी), (ii) सौ. हेमांगी अतुल जोशी (मुलगी), (iii) सौ. माधवी अमोल जोशी (मुलगी), आणि (iv) सौ. दिप्ती निनाद केळकर (मुलगी) हे त्यांचे केवळ कायदेशीर वारस आहेत.

सदर मालमत्तेच्या संदर्भात विक्री, हस्तांतरण, भाडेकरू, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, आर्थिक मोबदला, वारसा, ताबा, भाडेपट्टी, धारणाधिकार, देखभाल, वहिवाट, योजना, मृत्युपत्र किंवा प्रलंबित कायदेशीर कारवाई किंवा हुकूम किंवा कोणताही न्यायालयीन आदेश किंवा बोजा या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही दावा असणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती आहे की, त्यांनी त्याबाबत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे, असे न केल्यास, असे कोणतेही दावे दुर्लक्षित करण्यात येतील आणि सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल.

दिनांक १४ जून, २०२६ सही/-

**सौ. पूनम साळसकर,**
ॲडव्होकेट
०१, तळमजला, सी विंग, प्रथमेश रेसिडेन्सी सीएचएस, देऊळवाडी, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९९.

रामेश्वर मीडिया

# २५ हून अधिक महिलांशी लग्न कोट्यवधींची फसवणूक

■ मिरा रोड

**देशभरातील** २५ हून अधिक महिलांशी खोटे लग्न करून त्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या अनुजकुमार चंद्रप्रकाश त्रिवेदी याला गुन्हे शाखा १ च्या पथकाने उत्तर प्रदेशातून अटक केली आहे. आरोपीचे खरे नाव अनुजकुमार त्रिवेदी (४७) आहे. तो मूळचा उत्तर प्रदेशातील नोएडा येथे राहणारा आहे. वर्तमान पत्रात लग्नासाठी जाहिरात देऊन तो महिलांना जाळ्यात ओढायचा. विधवा, लग्न न झालेल्या महिलांना तो आपले लक्ष्य बनवत होता. मिरा रोडमध्ये राहणाऱ्या ४५ वर्षीय महिलेशी त्याने अशाप्रकारे जाळ्यात ओढून लग्न केले. विवाहानंतर लखनौ मध्ये घर बांधण्याच्या नावाखाली टप्प्याटप्प्याने एकूण ८२ लाख रुपये रोखे घेतले. यानंतर त्याने पीडित महिलेला दिल्लीत नेले तिचे ३३ तोळे सोन्याचे दागिने काढून फरार झाला. या पीडितेची एकूण ९७ लाख रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी तिने मिरा रोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

गुन्हे शाखा १ च्या पथकाने तांत्रिक तपास करून आरोपी त्रिवेदी याला उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथून अटक केली. आरोपी त्रिवेदी २०१२ पासून अशाप्रकारे महिलांची फसवणूक करत होता, तो अजय अग्रवाल, अजय संतोष सिंह, जयप्रकाश रमेशचंद गुप्ता आदी बनावट नावांचा वापर करून महिलांना प्रेमाच्या जाळ्यात अडकवत, सहानुभूती मिळवत त्यांची आर्थिक फसवणूक करत होता असे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन सानप यांनी सांगितले. प्राथमिक तपासात आरोपीने देशातील विविध राज्यांमधील २५ हून अधिक दिव्यांग, मतिमंद, घटस्फोटित व असहाय महिलांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
**TENDER NOTICE**

Tenders are invited for Procurement of LT XLPE Al Armoured Cables of size 3.5 C X 95 sq.mm & 3.5 C X 70 sq.mm. with Estimated Cost of Rs. 667.46 Lakhs against MSEDCL advertised Tender on website vide no. MMD/T-LTM-09/0626 due for submission on dtd. 02.07.2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

HO PR 141/26 Chief Engineer (MMD)

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
**TENDER NOTICE**

Tenders are invited for supply of 33 kV/11 kV, 33 kV/22 kV & 22 kV/11 kV, 10 MVA Power Transformers against Tender No. MMD/ T-HTM1-04/0626 through e-tendering process with Estimated Cost of Rs. 21,589 Lakhs against MSEDCL advertised Tender on website vide No. MMD/T-HTM1-04/0626 due for submission on dtd. 01.07.2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/.

HO PR No.139/26 dtd.12.06.2026 Chief Engineer (MMD)

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
**TENDER NOTICE**

Tenders are invited for Procurement of LT XLPE Al Armoured Cables of size 3.5 CX 185 sq.mm. with Estimated Cost of Rs. 752.70 Lakhs against MSEDCL advertised Tender on website vide no. MMD/T-LTM-08/0626 due for submission on dtd. 02.07.2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

HO PR 140/26 Chief Engineer (MMD)

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र

**मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) २०२६**

**बीएलओ गृहभेटी : ३० जून ते २९ जुलै २०२६**

- ✓ गृहभेटीपूर्वी शक्य झाल्यास *voters.eci.gov.in* / *ECINet App* वर मागील SIR मधील आपला किंवा आई-वडिलांचा तपशील (नाव, मतदारसंघ, यादी भाग क्र., अनु. क्र.) शोधून ठेवावा.
- ✓ गृहभेटीदरम्यान बीएलओने, आपणास दिलेल्या गणना अर्जात आवश्यक माहिती भरून व स्वाक्षरी करून त्याची एक प्रत बीएलओला द्यावी व पोच घेऊन एक प्रत स्वत: जवळ ठेवावी.
- ✓ आपले किंवा आई-वडिलांचे नाव मागील SIR मध्ये नसल्यास, खालीलपैकी कोणतेही एक कागदपत्र तयार ठेवावे.

**१)** जन्माचा दाखला, **२)** पासपोर्ट, **३)** इ. १० वी चे (मॅट्रिक) किंवा शैक्षणिक प्रमाणपत्र, **४)** रहिवासी प्रमाणपत्र, **५)** जात प्रमाणपत्र, **६)** सरकारी किंवा सार्वजनिक उपक्रम क्षेत्रातील कर्मचारी / निवृत्तीवेतन ओळखपत्र, **७)** राज्य/स्थानिक प्राधिकरणाची कुटुंब नोंदवही, **८)** शासनाने दिलेले जमीन किंवा घर वाटप प्रमाणपत्र, **९)** वन हक्क प्रमाणपत्र, **१०)** राष्ट्रीय नागरिक नोंदणीचा पुरावा, **११)** बँक, टपाल कार्यालय, जीवन विमा महामंडळ किंवा सरकारने १ जुलै १९८७ पूर्वी दिलेले ओळखपत्र/प्रमाणपत्र,

तसेच **१२)** आधार कार्ड ओळखपत्र पुरावा म्हणून स्वीकारले जाईल

**गृहभेटींदरम्यान बीएलओंना सहकार्य करा**

**"कोणताही पात्र मतदार वंचित राहणार नाही, कोणताही अपात्र व्यक्ती समाविष्ट होणार नाही"**


२००२ च्या मतदार यादीत तपशील शोधा | ECINET APP डाऊनलोड करा

**मतदार मदत क्र. १८०० २२ १९५०**

Chief Electoral Officer Maharashtra | ceo_maharashtra | CEO Maharashtra | CEO_Maharashtra

क्रमांक : आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी ११००

# नवाकाळ शब्दकोडे १६३६



**आडवे शब्द –**

१. अखेर ३. चंद्र ५. पराभव ७. शुष्कता १०. पन्ना, पाचू १२. पती १४. गर्द, घट्ट १५. वेगाने, जलदीने १६. धोशा, टुमणे १८. जबाबदारीची जाणीव नसलेला, बेपर्वा २१. दिमाख २२. नोकर, गुलाम २३. पळून गेलेला २५. नांगरणीचा प्राणी २८. नेहमी २९. लांब धाग्याचा कापूस ३२. किमया ३३. मुंज ३५. अर्थशून्य ३७. सर्वांनी एकजुटीने न राहता आपापले गट करून राहणे ४०. झुंज ४२. राक्षस ४३. स्वच्छ; मुलींचे एक नाव ४४. नवरदेव ४५. उणे ४७. निखारा ४९. ठाऊक नसलेले ५०. शिंपडणे, सिंचन ५२. पोळी भाजण्याचा पत्रा ५४. असमर्थ, असहाय ५५. झोपेतून उठणे ५७. पशूवत नीच वर्तन करणारा ५९. वस्त्र ६०. वटवट ६२. श्वसनासाठी आवश्यक गोष्ट ६३. नौका ६४. जेवणाची थाळी ६५. कंडेसर पक्षी; तांबड्या-पांढऱ्या फुलांचे एक झाड ६६. शिकारीच्या वेळी टेहळणीसाठी झाडावर उंच बांधलेली तात्पुरती बैठक ६७. गोणपाट ६९. उपयोग करणे ७०. शासनाचे कररूपाने उत्पन्न ७१. एक अप्सरा, शकुंतलेची आई ७३. हडळीचा कथित प्रकार ७५. पश्चिम दिशा ७७. एक औषधी वनस्पती, गोखरू ७९. छातीत डावीकडे असलेला अवयव ८०. आनंद ८२. मालवाहतूक करणारी रेल्वे ८४. सेवावृत्ती असलेला ८६. स्वतःचे ८७. समुद्र ८८. लहान तांब्या ८९. रानटी रेडा ९०. युद्धाचे स्फुरण ९१. हातांनी केलेल्या खाणाखुणा ९२. टोमॅटोचे तोंडीलावणे ९४. एकाग्र नजर ९६. अर्भकाचे केस ९८. बेलगाम ९९. आतिथ्य १०१. बड्याबोळ १०३. थयथयाट १०६. लहान मुलींची कर्णभूषणे १०७. श्रीखंडाचे पूर्वरूप १०८. मोठे वाहन १०९. सहजगत्या

**उभे शब्द –**

१. सरकारी अधिकारी २. बाणांचा भाता ३. कल्याण ४. पांढरा ५. शस्त्राची मूठ ६. उत्तर ७. तटबंदी ८. ग्रोसचा बारावा भाग ९. तलवारीपेक्षा छोटे शस्त्र ११. डोंगराचा सुळका १३. गुलामी १४. दरवाजा १७. पाश्चात्यांना अशुभ वाटणारी संख्या १९. बाहेरचा २०. बायको २१. सत्कारमूर्तीला नारळासह मिळणारे उंची उपरणे २३. भौतिक शास्त्र, फिजिक्स २४. दमट हवेत लोखंडाच्या पृष्ठभागावर येणारा तांबूस थर २५. लहान मुलांच्या गोट्यांच्या खेळातील पांढरी गोटी २६. ऐकलेले २७. आकलन, उपदेश २८. माळ, हार; बरोबरी ३०. पिकांची पेरणी ३१. देवी, दुर्गा ३३. धार्मिक नेम ३४. कोंदट जागा ३५. नेहमी ३६. उणीव, न्यून ३८. कागद फाडणे ३९. प्राण ४१. मेघ, घन ४२. नशिबाने लाभलेले ४६. ज्ञाती ४७. चंद्र ४८. प्रथेने चालत आलेली गोष्ट ५०. लहान मूल, बालक ५१. सूर्य ५३. मार्गक्रमण ५४. पालेभाजी वगैरेत आढळणारा कीटक ५६. जरुरी, आवश्यकता ५८. तलाठी ६१. अगदी लहान अंश ६२. निरोप्या, दूत ६५. रागाने ओरडणे ६६. केशरी डाळ ६७. गवताची काडी ६८. मोराचे ओरडणे ७२. प्रेमळ मित्र ७३. जीवात जीव येणे, धीर येणे ७४. लबाड, ढोंगी ७६. हळुवारपणे ७८. नीटनेटकेपणा ८१. अंधारात चमकणारा कीटक ८२. मत्स्य ८३. थंड, शीतल ८५. हौतात्म्य ८६. स्वच्छ व पारदर्शी ८८. गळेपडू, लाळघोट्या ९१. लोभी, लालची ९२. मोरोपंतांचे अजरामर काव्य ९३. पडवी ९५. मेंढीचे पिल्लू ९६. धान्य दळण्याचे दगडी अवजार ९७. उपाय ९८. सुट्टे पैसे १००. अचानक झालेली इच्छा १०२. व्यापारातील फायदा १०३. मोठी बहीण १०४. काफिला १०५. प्रेयसी, कांता •

## नवाकाळ कोडे क्रमांक १६३५ चे उत्तर

**आडवे शब्द :** २. अवसर ५. वक्ता ७. विप्र ११. सच्छील १२. मगरूर १४. हवन १५. माशा मारणे १६. गुदस्त १८. बाईलवेडा १९. साथी २०. समंजस २२. दाब २३. साव २४. वसुमती २६. राबता २८. वाख ३०. थरकाप ३१. माठ ३२. भरीत ३४. हरपररेवडी ३७. म्यान ३९. नूपुर ४१. दीन ४३. दीन ४४. सद ४६. तोडगा ४८. मायभूमी ४९. मार्गशीर्ष ५१. घारगे ५२. कैफ ५३. वशेळी ५५. क्षर ५६. रण ५७. लड ५८. शिला ५९. साकव ६०. कापूस ६३. खवीस ६४. कारीट ६५. पर्वत ६६. यक्षधन ६९. पावा ७०. पगार ७२. द्वाड ७३. तगादा ७५. डग ७६. पावटा ७७. तीज ७८. हुशार ८१. अंधार ८२. तान ८४. रवा ८६. वाटप ८८. रजक ८९. सांडणी ९०. महानता ९३. वचपा ९५. नटवा ९७. यंत्र ९८. वानर ९९. लेक १०१. काटक १०२. दारवान १०३. निवारण १०५. औक्षण १०६. पेरू १०७. टवाळ १०८. गारवा १०९. सणवार

**उभे शब्द :** १. आसपास २. अलगुज ३. समस्त ४. रग ५. वरई ६. घेवडा ८. प्रमाथी ९. सामानसुमान १०. देणे १३. रुबाब १४. हवेली १७. दसरा १९. सावकाश २१. मंजिरी २२. दातार २३. सार २४. वसुमती २७. बहर २८. वार २९. खरेदी ३०. थडी ३२. भरीस घालणे ३३. तनू ३५. पल्याड ३६. वनमाळी ३७. म्यानमार ३८. अवर्षण ४०. पुड्या ४२. अभूतपूर्व ४५. दरड ४६. तोफ ४७. गावकरी ५०. शीर ५२. कैलासपती ५४. शेवट ५८. शिवी ५९. साकार ६०. कापड ६१. सतत ६२. रुक्ष ६३. खवाटा ६६. यदा ६७. धडधाकट ६८. नगर ६९. पावन ७१. गाजर ७२. द्वार ७४. गादी ७६. पाताळयंत्री ७९. शालीन ८०. पाटव ८१. अंजन ८३. खडतर ८५. वामन ८७. पचका ९१. हार ९२. तालेवार ९४. पाटलोण ९६. वाखाणणी ९८. वानवा १००. करवा १०२. दारू १०३. वाट १०४. निगा १०५. और




# राशिभविष्य

**रविवार १४/०६/२०२६ ते शनिवार २०/०६/२०२६**

## मेष

**या आठवड्यात** संघर्ष करून तुम्हाला यश मिळवावे लागेल. त्यासाठी योग्य नियोजन व धडाडी आवश्यक ठरेल. कुटुंब, पैसा याबद्दल सुरुवातीला विनाकारण मनामध्ये भीती राहील. बोलण्यामुळे कटुता येऊ शकते. काळजी घ्या. आठवड्याच्या मध्यानंतर परिस्थिती सकारात्मक होईल. हाती घेतलेली कामे वेळेत पूर्ण होतील यावर लक्ष ठेवा. आर्थिक बाजू संयमाने हाताळणे योग्य ठरेल. तुमच्याकडे असलेल्या माहितीचा व्यवहारात पूर्ण उपयोग करून घ्या. प्रवासाचे योग आहेत, त्यातून नवीन संधीही उपलब्ध होतील.

घरामध्ये आनंदी वातावरण राहील. तुम्ही रागावर, बोलण्यावर नियंत्रण ठेवावे. छोटे समारंभ, गृहसजावट यासाठी आर्थिक तरतूद करून ठेवा. मुलांबद्दल थोडी काळजी वाटेल. परंतु चर्चेने त्यांचे प्रश्न मार्गी लावा. भावंडे, जोडीदार यांचे सहकार्य मिळेल. मित्रमंडळी मात्र पारखून घ्या.

कार्यक्षेत्रामध्ये स्पर्धेचा योग्य अंदाज घेऊन नियोजन करावे. पर्यायी व्यवस्था तयार ठेवा. तुमच्या अंगभूत कौशल्याचा, क्षमतेचा योग्य ठिकाणी वापर करावा. सध्या अपेक्षित लाभाचे प्रमाण कमी राहिले तरी भविष्याचा विचार महत्त्वाचा ठरेल. नोकरदारांनी स्वबळावर स्वतःला सिद्ध करावे.

**शुभ दिनांक :** १६, १७.

## वृषभ

**आठवड्याची** सुरुवात चांगली होईल. तुमच्या कर्तृत्वाला वाव देणारा सध्याचा काळ आहे. त्याचा पूर्ण फायदा करून घ्यावा. मनामध्ये कुठलीही भीती, शंका न बाळगता ठामपणे निर्णय घ्या. बंडखोरपणा व आक्रमककृती नियंत्रणात राहू द्या. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी तुमची क्षमता, कौशल्य व पूर्ण माहितीच्या आधारावर कृती करावी. आर्थिक स्थिती चांगली राहील. मात्र पैसा अडकून राहणार नाही यासाठी सावध राहा. श्रमाला भाग्याची साथ मिळणार आहे. लाभाचे प्रमाण वाढेल. नियमांची चौकट तोडून चालणार नाही.

घरामध्ये सर्वसाधारण वातावरण राहील. कौटुंबिक प्रश्न सोडवताना जबाबदारी व पुढाकार घ्यावा लागेल. व्यावहारिक बाजू सांभाळण्यासाठी स्पष्ट परंतु सौम्य भाषा योग्य ठरेल. जोडीदाराचे मत दुर्लक्षित करू नका. मुलांसाठी नवीन संधी उपलब्ध होईल.

उद्योगव्यवसायामध्ये नवीन योजना राबवता येतील. कायदेशीर बाजू पूर्ण तपासूनच व्यवहार पूर्ण करा. कार्यक्षेत्रामध्ये जबाबदारी वाढेल. निर्णय घेताना अपेक्षित स्वातंत्र्य मिळणार नाही. संयम ठेवावा. नोकरदारांना वरिष्ठांच्या मर्जीप्रमाणे वागावे लागेल.

**शुभ दिनांक :** १८, १९.

## मिथुन

**आठवड्याची** सुरुवात फारशी समाधानकारक नसली तरीही नंतर परिस्थिती सकारात्मक होईल. आत्मविश्वास चांगला राहील. राशीस्वामी बुध तुमच्याच राशीत असल्यामुळे तुम्हाला बळ मिळालेले आहे. तुमच्यामधील व्यवहारचातुर्याचा योग्य उपयोग करून घ्यावा. बोलताना योग्य शब्दांचा वापर आवश्यक आहे. आर्थिक स्थिती चांगली राहील. काटकसरीला मात्र महत्त्व द्यावे. गुंतवणूक करताना तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच करा.

कौटुंबिक खर्च वाढेल. मुले व जोडीदाराच्या इच्छा पूर्ण कराल. अनावश्यक खर्च टाळणे अवघड जाईल. घरातील प्रश्न मार्गी लावा. तुमचा आदर वाढेल. भावंडे व मित्रांबरोबर वेळ घालवाल. घर व कार्यक्षेत्र यामध्ये समन्वय साधताना थोडी तारांबळ उडणार आहे. वेळेचे योग्य नियोजन करावे.

कार्यक्षेत्रामध्ये तुमच्या आवडीप्रमाणे काम करण्याची संधी मिळेल. त्याची व्यावहारिक बाजू तपासून पाहा. स्पर्धक, हितशत्रूकडे दुर्लक्ष करू नये. नोकरदारांना वरिष्ठांची साथ मिळेल.

आरोग्याच्या तक्रारींकडे वेळीच लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक :** १६, १७, २०.

## कर्क

**राशीस्वामी** चंद्राचे भ्रमण तुमचा उत्साह वाढवणार आहे. मन स्थिर ठेवा व निर्णय घ्या. नियमांचे पालन जरूर करावे. आत्मविश्वास चांगला ठेवून कृतीला प्राधान्य द्यावे. भाग्याची साथ मिळणार आहे. गुरुचे पाठबळ असताना शुक्राचेही राशीभ्रमण अनेक सकारात्मक गोष्टी घडवून आणणार आहे. घाईगडबडीत निर्णय घेणे, अति धाडसीपणा टाळावा. खर्चावर नियंत्रण ठेवावे लागेल. लाभाचे प्रमाण सर्वसाधारण चांगले राहील. आर्थिक गुंतवणूक मात्र पुढे ढकलावी.

कुटुंबामध्ये संमिश्र वातावरण राहील. मुलांसाठी अलिप्त धोरण ठेवून काही ठाम निर्णय घ्यावे लागतील. कार्यक्षेत्रामध्ये कामाचा ताण वाढला तरी घरासाठी आवर्जून वेळ काढावा लागेल. जोडीदाराबरोबर सामंजस्य राहील.

कार्यक्षेत्रामध्ये चलबिचल न करता कृतीला प्राधान्य द्यावे. स्वप्नरंजनात न रमता व्यावहारिकता सांभाळावी. कागदपत्रांची पूर्तता करताना सावधगिरी बाळगा. नवीन व्यवहार करताना कायदेशीर बाबी काटेकोरपणे पाळाव्यात. नोकरदारांनी आधी केलेल्या कामाचे चीज होईल.

पोटाच्या तक्रारींकडे लक्ष द्या.

**शुभ दिनांक :** १८, १९.

## सिंह

**महत्त्वाची** कामे आठवड्याच्या पूर्वार्धात करून घ्यावीत. तुमच्या श्रमाला भाग्याची साथ आहे. कामामध्ये सातत्य ठेवा. कोणावर अवलंबून न राहता स्वतःच्या क्षमतेप्रमाणे वाटचाल करावी लागणार आहे. त्याप्रमाणे कामाचे नियोजन करावे. आर्थिक स्थिती व लाभाचे प्रमाण चांगले राहील. नवीन संधी समोर दिसत असल्या तरी सावधगिरीने व्यवहार करावे. नेतृत्वगुण व बुद्धीचातुर्य उपयोगी पडणार आहे. बोलताना मात्र काळजी घ्या. प्रवासाचे योग असले तरी अडथळे पार करावे लागतील.

कुटुंबाबरोबर चांगला वेळ घालवाल. सहलीचे नियोजन होईल. त्यासाठी आर्थिक तरतूद करावी लागेल. मुलांच्या प्रगतीसाठी समाधानकारक मार्ग मिळतील. जोडीदारासाठी आवर्जून वेळ काढा. त्याच्या अनुभवाचा उपयोग होईल.

कार्यक्षेत्रामध्ये अनपेक्षित चढ-उतार जाणवतील. योग्य नियोजनाने व चतुराईने त्यातून मार्ग काढता येतील. गुप्त शत्रूच्या कारवाया वाढतील. स्पर्धेला तोंड द्यावे लागेल. नोकरदारांनी सावधगिरीने पावले उचलावीत.

चांगले आरोग्य राखण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

**शुभ दिनांक :** १६, १७, २०.

## कन्या

**आठवड्याचा** मध्य महत्त्वाच्या कामांसाठी योग्य राहील. निर्णय घेतानाच स्थिर मनाने घ्यावा. कृती योग्य वेळेत होईल याकडे आवर्जून लक्ष द्या. आठवड्याची सुरुवात थोडी दडपणाने होईल. त्यामुळे नियोजित कामासाठी पूर्ण माहिती, ज्ञान मिळवून उत्तम नियोजन करावे. राशीस्वामी बुध कर्मस्थानी स्वराशीत आहे. याचा सकारात्मक उपयोग होईल. उत्साहाच्या भरात चुकीचे निर्णय घेऊ नका. अनुभवी व्यक्तीचा सल्ला उपयोगी ठरणार आहे. आर्थिक स्थिती चांगली राहील.

कुटुंबामध्ये चांगले वातावरण राहील. घरामध्ये विनाकारण मतभेद होऊ देऊ नका. एकत्रित कौटुंबिक व्यवसायातून नफा होईल. संततीच्या दृष्टीने चांगला काळ आहे. अविवाहितांचे विवाह ठरू शकतील. घरातील ज्येष्ठांचा आशीर्वाद मिळेल.

कार्यक्षेत्रामध्ये स्वतःमध्ये, कार्यपद्धतीमध्ये काही बदल करावे लागतील. नवीन योजना प्रत्यक्षात आणताना अडचणी आल्या तरी पुन्हा प्रयत्न करा यश मिळेल. गुप्त शत्रूंकडे दुर्लक्ष करू नका. स्पर्धात्मक परिस्थितीमध्ये तुमचे नियोजन कौशल्य उपयोगी ठरेल. प्रतिष्ठा वाढेल.

वाहन चालवताना काळजी घ्यावी.

**शुभ दिनांक :** १६, १७, १८, १९.

## तूळ

**आठवड्याचा** उत्तरार्ध तुमच्यासाठी चांगला ठरेल. आठवड्याचे सुरुवात अडथळ्याने होईल. राशीस्वामी शुक्र कर्मस्थानी आहे. कामे पूर्ण करण्यासाठी कामाचा वेग वाढवावा लागेल. काही चांगल्या संधी समोर येतील त्यासाठी तयार राहावे. आर्थिक स्थिती चांगली राहील. आत्ता केलेल्या कामाचे पैसे लगेच मिळणार नाहीत. नंतर त्याचे चीज होईल.

कुटुंबामध्ये काही समस्या असल्यास त्यावर मार्ग. घरातील ज्येष्ठांचे आरोग्य सुधारेल. जोडीदाराचे वर्चस्व राहील. मतभेद सुसंवादाने टाळावेत. संततीबाबत अडचणीतून चांगला मार्ग निघेल. कुटुंबाच्या अपेक्षा पूर्ण करताना थोडी तारांबळ उठणार आहे. कार्यक्षेत्रामध्ये कामाचा ताण जाणवेल. तुमच्या ज्ञानाचा, ओळखींचा उपयोग होईल. योग्य नियोजनाने कृती केल्यास अनेक प्रश्न मार्गी लागतील. व्यावसायिकांना भांडवल उभे करताना त्रास होणार आहे. आर्थिक निर्णय चुकू नयेत म्हणून तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्या. नोकरदारांनी अहंकार बाजूला ठेवून कामावर लक्ष केंद्रित करावे.

शारीरिक व मानसिक आरोग्य सांभाळा.

**शुभ दिनांक :** १८, १९, २०.

## वृश्चिक

**आठवड्याची** सुरुवात व अखेर चांगली होईल. मध्ये अडथळे येतील. कामातील सातत्य व संयम यामुळे तुम्ही कार्यपूर्ती कराल. चिवटपणे प्रयत्न करत राहणे हे तुमच्या राशीचे वैशिष्ट्य खूप उपयोगी पडेल. आक्रमक पवित्रा योग्य ठिकाणी व योग्य वेळेस घ्यावा. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहील. खर्चावर नियंत्रण ठेवताना तारांबळ उडेल. घाईगडबडीत कृती करताना तुमच्या हातून चुका होणार नाहीत याबाबत सावध राहा. झालेली चूक निस्तरताना तारांबळ उडेल.

घरामध्ये सकारात्मक गोष्टी घडू लागतील. कुठेही गैरसमज होणार नाही याची मात्र काळजी घ्या. जोडीदाराचा सल्ला, मदत उपयोगी ठरेल. मतभेद मात्र टाळावेत. वडिलोपार्जित संपत्तीसंबंधित प्रश्न मार्गी लावता येतील. मुलांच्या भविष्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळेल.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन व्यवहार, नवीन संकल्पना प्रत्यक्षात आणणे टाळावे. योग्य संधी येईपर्यंत वाट पाहावी. भागीदारी व्यवहारात पारदर्शकता ठेवा. मतभेद सुसंवादाने टाळता येतील. अंगभूत कौशल्य उपयोगी पडेल. स्पर्धकांशी जशास तसे वागणे योग्य ठरेल.

आरोग्याकडे नीट लक्ष द्या.

**शुभ दिनांक :** १९, २०.

## धनु रास

**महत्त्वाच्या** कामांसाठी आठवड्याचा पूर्वार्ध चांगला राहील. सध्याचा काळ अत्यंत संयमाचा, कसोटीचा आहे. सकारात्मक गोष्टी घडवून आणाव्या लागतील. तुमच्या राशीस्वामी गुरूला बळ मिळाले आहे. मन स्थिर ठेवून कामामध्ये योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्यास कार्यपूर्ती होईल. घाई, अति धाडसी स्वभाव त्रासदायक ठरेल. पैसा अडकून राहणार नाही यासाठी सावधगिरी बाळगा. झटपट फायदा देणाऱ्या कुठल्याही मोहाला बळी पडू नका.

घरगुती प्रश्न प्रयत्नाने सोडवता येतील. देण्याघेण्याचे व्यवहार पारदर्शकता ठेवून पूर्ण करावे. कुटुंब व कार्यक्षेत्र दोन्हीकडे लक्ष देताना तारांबळ होईल. जोडीदार व संतती पूर्ण सहकार्य करतील. मित्र पारखून घ्या. भावंडांना मदत करावी लागेल.

कार्यक्षेत्रामध्ये अनपेक्षित उलाढाली होतील. विरोधक सक्रिय झाले तरी तुम्ही त्यावर मात करू शकाल. तुमचे योग्य धोरण, बुद्धीचातुर्य यामुळे यश मिळवाल. तात्पुरता विचार न करता भविष्यातील फायदेशीर योजना उपयुक्त ठरतील. तुमच्यामधील कौशल्य व गुणवत्ता तुम्हाला यश मिळवून देणार आहे.

आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. पोटाच्या समस्या जाणवतील.

**शुभ दिनांक :** १६, १७.

## मकर

**संमिश्र** ग्रहमान असलेला हा आठवडा आहे. आठवड्याच्या सुरुवातीला उत्साह जाणवणार नाही. नंतर परिस्थिती बदलेल. मनामध्ये अनेक नवीन कल्पना येतील. त्याची व्यावहारिक बाजू तपासून पाहा. प्रयत्नांना, श्रमाला गुरूमहाराजांचे आशीर्वाद मिळणार आहेत. योग्य नियोजन व सातत्य कामामध्ये ठेवावे. आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. प्रतिस्पर्ध्यांवर बुद्धीचातुर्याने मात करता येईल. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहील. अनपेक्षित खर्च निघू शकतात. लाभाचे प्रमाण चांगले राहिले तरी बचतीकडे लक्ष द्यावे लागेल. गृहसंख्य टिकवून ठेवावे लागेल. जोडीदार, संतती यांच्याशी सुसंवाद ठेवा. भावंडे, मित्रपरिवार यांच्याशी जमवून घ्यावे लागेल. मुलांच्या अपेक्षा पूर्ण करताना थोडी कसरत करावी लागेल. ज्येष्ठांचे म्हणणे मान्य करावे लागेल. कार्यक्षेत्रामध्ये प्रतिकूलता जाणवत असली तरीही त्यातूनही तुम्ही स्वतःला सिद्ध करू शकाल. तुमच्यातील क्षमतेचा पूर्ण उपयोग करून घ्यावा. व्यावसायिकांना नवीन कल्पना सुचतील. प्रत्यक्षात आणण्यासाठी सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरेल. भागीदारीतील व्यवसाय यश देईल. नोकरदारांनी चतुराईने समस्येतून मार्ग काढावा. अहंकार बाजूला ठेवावा लागेल.

**शुभ दिनांक :** १६, १७, १९.

## कुंभ रास

**आठवड्याच्या** सुरुवातीला परिस्थितीचा अंदाज घेऊन कामाचे नियोजन करावे. महत्त्वाची कामे उत्तरार्धात पूर्ण होतील. मन स्थिर ठेवून कृतीला महत्त्व द्या. प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी जाऊन सखोल अभ्यास करणे हे तुमचे वैशिष्ट्य तुम्हाला उपयोगी पडेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. आर्थिक आवक चांगली असली तरीही खर्चही मोठ्या प्रमाणात होतील. त्यावर नियंत्रण ठेवावे. घाईघाईने निर्णय घेऊ नयेत. इच्छाशक्तीच्या जोरावर कामे पूर्ण कराल. कौटुंबिक आघाडी सांभाळावी लागेल. विनाकारण छोट्या समस्या निर्माण होतील. वेळीच त्याकडे लक्ष द्यावे. तुम्ही पुढाकार घेऊन त्यातून मार्ग काढू शकाल. घरातील ज्येष्ठ सहकार्य करण्याच्या मनस्थितीत नाहीत. मुले, जोडीदार व तुमच्यामध्ये अहंकार येऊ देऊ नका.

उद्योग व्यवसायात कामे वेळेत पूर्ण होतील याकडे लक्ष द्यावे. नाहीतर तुमचे नियोजन कोलमडू शकते. आर्थिक अंदाजही चुकण्याची शक्यता आहे. कामानिमित्त प्रवास होऊ शकतात. स्पर्धकांना लढा द्यावा लागेल. काम पूर्ण झाल्याशिवाय त्याची वाच्यता करू नका. भाग्याची साथ फरशी नाही. श्रमामध्ये सातत्य ठेवावे लागेल.

आरोग्याच्या तक्रारी दुर्लक्षित करू नयेत.

**शुभ दिनांक :** १८, १९, २०.

## मीन

**आठवड्याची** सुरुवात चांगली होईल. नवीन संधी समोर येतील. राशीस्वामी गुरू केंद्रस्थानी उच्च राशीत आहे. स्वतःवर विश्वास ठेवून उत्साहात कामाला सुरुवात करा. मन निराश होऊ देऊ नका. मानसिक अस्वस्थता निर्णय घेताना त्रासदायक ठरेल. आर्थिक आघाडी चांगली राहील. बचत केलेला पैसा अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्याने गुंतवू शकता. खर्च वाढला तरी तो योग्य कारणासाठी होईल. अंगभूत कलागुणांना वाव मिळेल.

घरामध्ये संमिश्र वातावरण राहील. जोडीदाराच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. मुलांच्या भवितव्यासाठी योग्य निर्णय घेतले जातील. मुलांच्या, कुटुंबाच्या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करताना व्यावहारिक बाजू विसरू नका. कार्यक्षेत्रामध्ये प्रतिस्पर्धी ओळखून तुमचे नियोजन करा. माणसांची योग्य पारख करावी. व्यवसायवृद्धीसाठी नवीन कौशल्य शिकून घेतल्यास फायदा होईल. पारंपरिक पद्धतीबरोबरच नवीन तंत्रज्ञानाचा वापर करा. नोकरदारांना वरिष्ठांची साथ मिळेल. व्यावसायिकांना भांडवल उभे करताना थोडा त्रास होईल. परंतु नियमाविरुद्ध कुठलीही कृती करू नये.

**शुभ दिनांक :** १९, २०.

**– ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे**

नवाकाळ

• मुंबई | रविवार १४ जून, २०२६ • पान -८

# उबाठा खासदारांची आज मातोश्रीवर बैठक



**मुंबई -** उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपल्या मातोश्री निवासस्थानी उद्या उबाठा खासदारांची महत्त्वाची बैठक बोलावली आहे. उबाठाचे काही खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याचा दावा शिंदे गटाचे नेते करत आहेत. त्यामुळे 'ऑपरेशन टायगर'च्या पार्श्वभूमीवर बोलावण्यात आलेल्या या बैठकीला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. आगामी राजकीय घडामोडी, पक्षाची रणनीती आणि संघटनात्मक बदल यावर या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. यासाठी उद्धव ठाकरे यांनी दिल्लीत असलेल्या सर्व खासदारांना मुंबईत उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, या बैठकीत उद्धव ठाकरे आपल्या खासदारांना कोणता कानमंत्र देणार आणि कोणत्या नव्या जबाबदाऱ्या सोपवणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. तसेच परभणीचे खासदार संजय जाधव हे गेल्या काही बैठकींना अनुपस्थित राहिल्याने ते उद्याच्या बैठकीला हजर राहणार का, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आसाममध्ये लष्करी विमानाचा अपघात
## वैमानिकासह पाच जवानांचा मृत्यू

■ दिसपूर



**आसाममधील** जोरहाट येथील रोवरियाह हवाई तळावर उतरताना आज सकाळी भारतीय वायुसेनेचे एक मालवाहू लष्करी विमान कोसळले. लँडिंगचा प्रयत्न करत असताना हा अपघात झाला असून, या दुर्घटनेत वैमानिकासह पाच जवानांचा मृत्यू झाला आहे. तर सहवैमानिक गंभीर जखमी झाला आहे.

अपघातग्रस्त विमान एएन-३२ प्रकारातील मालवाहू विमान होते. हे विमान प्रामुख्याने लष्करी रसद आणि साहित्य वाहतुकीसाठी वापरले जाते. विमान हवाई तळावर उतरण्याच्या प्रक्रियेत असतानाच नियंत्रण सुटल्याने ते कोसळल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. अपघातानंतर विमानाला आग लागली आणि ते दोन तुकड्यांमध्ये विभागले गेले. भारतीय वायुसेनेने या घटनेची दखल घेतली असून, अधिकृत तपशिलांची प्रतीक्षा असल्याचे सांगितले आहे. या अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## मतफुटी रोखण्यासाठी नाशिकच्या
## नगरसेवकांना ठाण्यात हलवणार

■ नाशिक

**नाशिक** विधान परिषद निवडणुकीत संभाव्य मतफुटी टाळण्यासाठी महायुतीने ऑपरेशन ठाणे मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत महायुतीच्या सर्व मतदार नगरसेवकांना ठाण्यातील एका अज्ञातस्थळी हलविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मतदानाच्या दिवशीच या सर्व नगरसेवकांना थेट नाशिकमध्ये आणले जाणार आहे.

महायुतीमध्ये नाशिकची जागा शिंदे गटाच्या वाट्याला आली आहे. भाजपाचे बंडखोर उमेदवार गोकुळ गीते यांच्या उमेदवारीनंतर संभाव्य दगाफटका टाळण्यासाठी महायुतीने आपली रणनीती अधिक कडक केली आहे. नाशिकमध्ये महायुतीच्या प्रमुख नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत मंत्र्यांनी आणि वरिष्ठ नेत्यांनी नगरसेवकांना मतदान प्रक्रियेबाबत विशेष मार्गदर्शन केले. तसेच, महायुतीच्या अधिकृत उमेदवारालाच मतदान करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

## वृद्ध दिसू नये! इंजेक्शनचा शोध
## चाचण्या सुरू! ६ महिन्यांनी निष्कर्ष

■ बोस्टन

**वाढत्या** वयामुळे थकवा, चेहऱ्यावरील सुरकुत्या, पेशींची झपाट्याने होणारी झीज ही खरे तर नैसर्गिक प्रक्रिया समजली जाते. प्रत्येकाच्या बाबतीत ती अटळ असते. परंतु आता विज्ञान या नैसर्गिक प्रक्रियेलाच आव्हान देण्याच्या तयारीत आहे. 'रिव्हर्स एजिंग' म्हणजेच वृद्धत्वाची प्रक्रिया उलटवणाऱ्या औषधाची मानवावरील पहिली चाचणी सुरू झाली असून, यामुळे या क्षेत्रात क्रांतिकारी बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अमेरिकेतील बोस्टन येथील 'लाईफ बायोसायन्सेस' या




बायोटेक स्टार्टअप कंपनीने या प्रयोगाची सुरुवात केली आहे. कंपनीने त्यांच्या पहिल्या रुग्णावर 'सेल्युलर रिप्रोग्रामिंग' तंत्रज्ञानावर आधारित इंजेक्शन वापरले आहे. विशेष म्हणजे, ही चाचणी काचबिंदू (ग्लुकोमा) असलेल्या रुग्णाच्या एका डोळ्यावर करण्यात आली आहे. या प्रयोगाचा मुख्य उद्देश म्हणजे वयानुसार कमकुवत झालेल्या पेशींना पुन्हा तरुण आणि सक्रिय बनवणे हा आहे. या इंजेक्शनद्वारे शरीरातील विशिष्ट जनुकांना सक्रिय केले जाते, जे पेशींना 'रिप्रोग्राम' करून त्यांची कार्यक्षमता सुधारण्यास मदत करतात. या प्रक्रियेनंतर काही आठवड्यांसाठी रुग्णाला अँटीबायोटिक » पान २ वर

## जी-७ परिषदेसाठी मोदी फ्रान्समध्ये
## स्लोवाकियाच्या दौऱ्यावरही जाणार

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी आज फ्रान्स आणि स्लोवाकियाच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर रवाना झाले. ते उद्या फ्रान्समधील नीस येथे असतील. त्यानंतर स्लोवाकियाचा दौरा करून पुन्हा फ्रान्समध्ये परततील. १५ जूनपासून फ्रान्समध्ये होणाऱ्या तीन दिवसीय जी-७ शिखर परिषदेत ते सहभागी होणार आहेत. भारत यंदा जी-७ शिखर परिषदेत तेराव्यांदा सहभागी होत आहे.

परिषदेदरम्यान जागतिक अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऊर्जा सुरक्षा, हवामान बदल आणि भू-राजकीय घडामोडींसह विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा अपेक्षित आहे. तसेच भारत आणि फ्रान्समधील संरक्षण सहकार्यांच्या पार्श्वभूमीवर राफेल लढाऊ विमानांशी संबंधित प्रस्तावांवरही चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पंतप्रधान मोदी फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युएल मॅक्रॉन आणि स्लोवाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्यासोबत स्वतंत्र बैठका घेणार आहेत. या चर्चांमध्ये आर्थिक, संरक्षण, उद्योग, तंत्रज्ञान आणि द्विपक्षीय सहकार्य वृद्धिंगत करण्यावर भर दिला जाणार आहे. फ्रान्स दौऱ्यात मोदी नीस, एवियन आणि पॅरिस या शहरांना भेट देणार आहेत.



## कांदा खरेदी दरात वाढ
## प्रति किलो १६.५० रुपये

■ नवी दिल्ली

**कांदा** उत्पादक शेतकऱ्यांना अधिक चांगला परतावा मिळावा यासाठी केंद्र सरकारने बफर साठा योजनेअंतर्गत कांदा खरेदी दरात वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार, आज आजपासून किमान हमी खरेदी दर प्रति किलो १६.५० रुपये करण्यात आला आहे. सध्या हा दर १५.८० रुपये आहे.

केंद्रीय अन्न व ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सोशल मीडियावरील संदेशातून ही माहिती दिली. केंद्र सरकारने किमान हमी खरेदी दर (एमएपीपी) १,६५० रुपये प्रति क्विंटल निश्चित केला आहे. हा दर आजपासून लागू होणार आहे. साठवणुकीस योग्य असलेल्या कांद्याच्या गुणवत्तेचा आणि सध्याच्या बाजारभावांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले. कांदा खरेदी प्रक्रिया अधिक बाजाराभिमुख आणि परिस्थितीनुरूप करण्यासाठी दरनिर्धारण पद्धतीतही सुधारणा करण्यात आली आहे.

दरम्यान, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याने कांद्याला प्रति क्विंटल किमान २,००० ते २,५०० रुपये दर जाहीर करण्याची ठाम मागणी अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी राज्य सरकारकडे केली. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, शासनाने शासकीय कांदा खरेदीसंदर्भातील काही अटी शिथिल करून दिलासा देण्याचा प्रयत्न केला असला तरी त्याचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेला नाही.

## नीट पेपरफुटीविरोधात काँग्रेसचे
## बुधवारपासून देशव्यापी आंदोलन

■ नवी दिल्ली

**नीट** पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने देशभरात आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे. या मोहिमेची सुरुवात बुधवार १७ जून रोजी राजस्थानमधील कोटा येथून होणार असून काँग्रेस खासदार राहुल गांधी येथे विद्यार्थी संमेलन घेणार आहेत. या संमेलनात ते पेपरफुटी आणि तरुणांशी संबंधित विविध मुद्यांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. कोटा हे देशातील प्रमुख कोचिंग हब म्हणून ओळखले जात असल्यामुळे या ठिकाणाहून मोहिमेला प्रारंभ करण्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी या देशव्यापी आंदोलनाची घोषणा करताना सांगितले की, राहुल गांधी हे विद्यार्थ्यांच्या आणि तरुणांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत. कोटा येथील कार्यक्रमानंतर १० जुलै रोजी प्रयागराज, ११ जुलै रोजी पाटणा आणि १४ जुलै रोजी दिल्ली येथे विद्यार्थी संमेलने आयोजित केली जाणार आहेत. या संमेलनांमध्ये स्पर्धा परीक्षांचे उमेदवार, युवक संघटना, शिक्षक आणि पेपरफुटी घोटाळ्यांमुळे नाहक त्रास सहन करावा लागलेले विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

## उमर खलिद, शर्जिल इमामचा जामिनासाठी दिल्ली कोर्टात अर्ज

**नवी दिल्ली -** सर्वोच्च न्यायालयाने जामीन फेटाळल्यानंतर दिल्ली दंगलीप्रकरणी आरोपी उमर खलिद व शर्जिल इमाम यांनी आता दिल्ली अतिरिक्त सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला आहे. कडकडडुमा न्यायालयात न्या. सुमेध सेठी यांनी त्यांच्या अर्जावर सुनावणी ४ जुलैला घेण्याचे निश्चित केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने जामीन नाकारून सहा महिने उलटून गेल्यानंतरही खटला तसूभरही पुढे सरकलेला नाही. अद्याप पोलिसांनी ठेवलेल्या आरोपांवर बचाव पक्षाच्या वकिलांचा युक्तिवादही पूर्ण झालेला नाही, असे शर्जिल इमाम याने आपल्या जामीन अर्जात म्हटले आहे. आपण गेली ६ वर्षे तुरुंगात असल्याचेही इमाम याने न्यायालयाच्या पुन्हा एकदा निदर्शनास आणून दिले. २०२० साली केंद्र सरकारच्या नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या (सीएए) विरोधात दक्षिण दिल्लीत अनेक ठिकाणी हिंसक आंदोलने झाली होती.

## जीडीपी आकडा फसवा रघुराम राजन यांचे मत

**नवी दिल्ली -** केंद्र सरकारने भारताचा विकास दर (जीडीपी) ७ टक्क्यांहून अधिक असल्याचा दावा केला आहे. मात्र रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी सरकारच्या या



आकड्यावर संशय व्यक्त केला आहे. सरकारने दिलेला जीडीपीचाआकडा फसवा आणि दिशाभूल करणारा आहे, असे स्पष्ट मत राजन यांनी मांडले. देशाच्या मजबूत आर्थिक वाढीचे सरकार पुढे करत असलेले आकडे वास्तव पूर्णपणे दर्शवतात का, असा सवाल राजन यांनी केला. कॉर्पोरेट क्षेत्रात कमी कमी होत चाललेली गुंतवणूक आणि परदेशी गुंतवणुकीत झालेली घट सरकारी आकडेवारीशी मुळीच सुसंगत नाही, असा युक्तिवाद राजन यांनी केला आहे.

## ले. जनरल धीरज सेठ देशाचे नवे लष्करप्रमुख

**नवी दिल्ली -** केंद्र सरकारने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची भारतीय लष्कराचे नवे प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. सध्या उपलष्करप्रमुख असलेले सेठ हे विद्यमान लष्करप्रमुख जनरल



उपेंद्र द्विवेदी यांची जागा घेणार आहेत. जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी ३० जून २०२४ रोजी पदभार स्वीकारला होता. त्यांचा कार्यकाळ जून २०२६ पर्यंत आहे. लष्करप्रमुखांचा कार्यकाळ ३ वर्षे किंवा वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंत असतो. डिसेंबर १९८६ मध्ये आर्मर्ड कोअरमध्ये दाखल झालेल्या धीरज सेठ यांना सुमारे ४० वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी जम्मू-काश्मीर, वाळवंट क्षेत्र आणि पश्चिम आघाडीवर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. ते दक्षिण-पश्चिम कमांड आणि दक्षिण कमांडचे प्रमुख राहिले असून संयुक्त राष्ट्रांच्या अंगोला मिशनमध्येही त्यांनी सेवा बजावली आहे.

## अदानींसोबत फिस्कटलेले कंत्राट
## केनियाने चढ्या किमतीने चीनला दिले

■ नैरोबी

**नैरोबी** विमानतळाच्या नूतनीकरणाचे कंत्राट केनियाने आता एका चिनी कंपनीला तब्बल ५० टक्के वाढीव किमतीवर दिले आहे. हे कंत्राट २.९ अब्ज डॉलरचे आहे.

दोन वर्षांपूर्वी या कामासाठी अदानी समूहाने केनियाला प्रस्ताव दिला होता. त्यावेळी अदानी समूहाने निम्म्याने कमी खर्चात हे काम करण्याची तयारी दर्शवली होती. मात्र त्याच दरम्यान अमेरिकेच्या न्याय विभागाने समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी आणि त्यांच्या निकटवर्तीयांवर भ्रष्टाचार आणि



फसवणुकीचा आरोप लावला होता. त्यानंतर केनियामध्ये अदानी समूहाच्या विरोधात अनेक आंदोलने झाली. कामगारांनी संप करून अदानी समूहाला कंत्राट देण्यास विरोध केला. त्यामुळे केनियाच्या राष्ट्राध्यक्षांनी अदानी समूहाने दिलेला प्रस्ताव रद्द केला होता. नैरोबीतील या विमानतळाचे नाव जोमो केनयाट्टा आंतरराष्ट्रीय विमानतळ असे आहे.

या विमानाचे विस्तारीकरण आणि नूतनीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी आता केनियाच्या राष्ट्राध्यक्षांनी चीनच्या चायना कम्युनिकेशन्स कन्स्ट्रक्शन कंपनीसोबत (सीसीसीसी) करार करण्यात आला आहे.

## घरगुती कामे करतानाही कमाई
## गृहिणींनी कपाळावर कॅमेरा लावायचा

■ मुंबई

**कृत्रिम** बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचे (एआय) क्षेत्र झपाट्याने विस्तारत आहे. एआयच्या वापराने हुबेहुब मानवाप्रमाणे कामे करणारे ह्युमनॉईड्स तयार करण्याची जणू स्पर्धाच सुरू आहे. मात्र एआय शिकवण्यासाठी माणूसच लागतो. त्यामुळे गृहिणींना आणि नित्योपयोगी कामे करणाऱ्या लोकांना अतिरिक्त उत्पन्न कमावण्याची नवी संधी उपलब्ध होत आहे. यासाठी गृहिणी असाल



तर तुमच्या घरातील रोजची कामे करताना फक्त डोक्याला कॅमेरा किंवा मोबाईल बांधून त्याचे चित्रीकरण करून दिल्यास या कामाचे तासाला २५० ते ३५० रुपये मानधन मिळत आहे.

गृहिणींना कचरा काढणे, लादी पुसणे, कपाटांची वगैरे साफसफाई तसेच स्वयंपाकघरातील कापणे, चिरणे, तळणे, भाजणे, मिक्सरवर वाटण तयार करणे घरातील दररोजची कामे करताना त्याचे व्हिडिओ शूटिंग करायचे आहे. यासाठी फक्त डोक्यावर एक विशिष्ट पट्टा बांधून त्यात कॅमेरा अडकवून वेगवेगळ्या कोनातून व्हिडिओ चित्रीकरण करावे लागते. इतर कुशल कामगारांनादेखील विविध हत्यारांचा » पान २ वर

## प्रणित मोरेच्या सर्व व्हिडिओंची
## गृह विभाग चौकशी करणार

■ मुंबई

**स्टँड-अप** कॉमेडियन प्रणित मोरेच्या कार्यक्रमांतील वादग्रस्त वक्तव्य प्रकरणी राज्याच्या गृह विभागाने गंभीर दखल घेत मोठा निर्णय घेतला आहे. केवळ व्हायरल झालेल्या काही क्लिप्सपुरतेच नव्हे तर मोरेच्या आतापर्यंतच्या सर्व व्हिडिओ कंटेंटची सखोल चौकशी करण्याचे आदेश गृह विभागाने दिले आहेत.

गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी याची माहिती देताना सांगितले की, समाजात विकृत स्वरूपाचा विनोद सहन केला जाणार नाही. या प्रकरणी सायबर पोलिसांकडून सर्व संबंधित व्हिडिओंची तपासणी करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. प्रणित मोरेच्या शोमधील काही व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. त्यातील एका कार्यक्रमात केईएम रुग्णालयातील डॉक्टरशी संबंधित कथित वक्तव्यांवरून संताप व्यक्त करण्यात आला. तर बिर्याणीच्या किश्शावरून नागरिक व संघटनांनी संताप व्यक्त केल्यानंतर महिला आयोगानेही नोटीस बजावली आहे.

## सिंगापूर हायकोर्टाची स्थगिती
## बायजू रवींद्रनची अटक टळली

■ सिंगापूर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**दिवाळखोरीत** गेलेल्या बायजुज या कोचिंग क्लासचे संस्थापक रवींद्र बायजू यांना न्यायालयाची बेअदबी केल्याच्या खटल्यात झालेल्या ६ महिन्यांच्या कारावासाच्या शिक्षेला सिंगापूर उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. त्यामुळे त्यांची अटक टळली आहे. न्यायालयाने आदेश देऊनही संबंधित कागदपत्र बायजू रवींद्रन यांनी न्यायालयात सादर केले नव्हते. त्यामुळे त्यांच्यावर न्यायालयाची बेअदबी केल्याचा ठपका ठेवत गेल्या महिन्यात न्यायालयाने त्यांना ६ महिन्यांच्या साध्या कैदेची शिक्षा सुनावली होती. रवींद्रन यांना १५ जून पर्यंत पोलिसांत शरण येण्यास सांगितले होते. मात्र रवींद्रन यांच्या वतीने न्यायालयात लेखी हमी देण्यात आली की, सर्व कागदपत्रे लवकरात लवकर सादर केली जातील. या लेखी हमीनंतर उच्च न्यायालयाने रवींद्रन यांच्या शिक्षेला स्थगिती दिली.

## २३ व २४ जूनला विठ्ठल दर्शन बंद

■ पंढरपूर

**श्री विठ्ठल-रुक्मिणी** मंदिरातील मूर्तीच्या संवर्धनाच्या कामासाठी २३ आणि २४ जून रोजी भाविकांसाठी दर्शन बंद ठेवण्यात येणार आहे. मूर्तीची झालेली झीज लक्षात घेता २२ ते २४ जूनदरम्यान संवर्धनाची प्रक्रिया राबवली जाणार असून, या कालावधीत देवाचे पदस्पर्श दर्शन बंद राहणार आहे.



श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे दीर्घकालीन जतन व्हावे, यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, राज्य पुरातत्त्व विभाग तसेच तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हे काम केले जाणार आहे. यासंदर्भात ११ जून रोजी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन तांत्रिक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली होती. मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राप्त शिफारशींनुसार २२ ते २४ जूनदरम्यान मूर्तीतील झिजलेल्या भागांची दुरुस्ती, सूक्ष्म छिद्रे भरणे तसेच संरक्षक आवरण देण्याची प्रक्रिया पार पडणार आहे. या कामादरम्यान मूर्तीचे पावित्र्य व सुरक्षा अबाधित राहावी, यासाठी २३ व २४ जून रोजी मंदिर पूर्णपणे दर्शनासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाकडून पर्यायी व्यवस्था करण्याबाबत चर्चा सुरू असून, मुखदर्शनाबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

## वैभव सूर्यवंशीनंतर धाकटा भाऊ
## आशीर्वादचीही तुफानी खेळी

■ पाटणा

**भारतीय** क्रिकेटमध्ये सध्या चर्चेत असलेल्या वैभव सूर्यवंशीच्या पावलावर पाऊल ठेवत त्याचा धाकटा भाऊ आशीर्वाद सूर्यवंशीनेही फलंदाजीची तुफानी झलक दाखवली. अवघ्या १० वर्षांच्या आशीर्वादने समस्तीपूर येथे झालेल्या सराव सामन्यात ८७ चेंडूंत १०३ धावांची तुफानी खेळी साकारत शतक झळकावले. त्याच्या खेळीत तब्बल २१ चौकारांचा समावेश होता. त्याच्या खेळीची क्रिकेट वर्तुळात चर्चा रंगली आहे.

समस्तीपूर येथे झालेल्या सराव सामन्यात क्रिकेट अकादमी ताजपूरकडून खेळतानाआशीर्वादने ८७ चेंडूंत १०३ धावांची शानदार खेळी साकारली. या खेळीत

### २१ चौकारांसह शतक

तब्बल २१ चौकार आणि एका षटकाराची आतषबाजी केली. आशीर्वादच्या शतकी खेळीच्या जोरावर क्रिकेट अकादमी ताजपूर संघाने २९.५ षटकांत चार गडी गमावून २३४ धावांचा डोंगर उभा केला. संघासाठी शिवम राजनेही



७५ चेंडूंत ५२ धावांचे योगदान दिले. शतक पूर्ण केल्यानंतर आशीर्वादने हेल्मेट उंचावत जल्लोष केला. आशीर्वादचा मोठा भाऊ उज्ज्वल सूर्यवंशीने त्याच्या शतकाचा व्हिडिओ आणि स्कोअरकार्ड शेअर केले. त्यानंतर क्रिकेटप्रेमींनी आशीर्वादवर कौतुकाचा वर्षाव केला. तर आशीर्वादचे वडील संजीव सूर्यवंशी यांनी मुलाच्या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त करत फेसबुकवर पोस्ट केली.

## जाती उपवर्गीकरण विरोधात
## २६ जून रोजी मुंबईत महामोर्चा

■ मुंबई

**अनुसूचित** जाती उपवर्गीकरणाच्या विरोधात राज्यातील विविध संघटना शुक्रवार २६ जून रोजी मुंबईत विधान भवनावर महामोर्चा काढणार आहेत. या पार्श्वभूमीवर दादर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत चर्मकार विकास संघाने महामोर्चाला जाहीर पाठिंबा देत मोठ्या संख्येने समाजबांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन केले.

या बैठकीला भीमराव आंबेडकर आणि आनंदराज आंबेडकर तसेच माजी समाजकल्याण मंत्री राजकुमार बडोले, बबनराव घोलप, चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, मुंबई प्रदेशाध्यक्ष सुभाष मराठे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी महामोर्चाचे नियोजन करण्याबाबत एकमताने निर्णय घेण्यात आला. अनुसूचित जातीतील सर्व ५९ समाजघटकांची एकजूट कायम ठेवण्यासाठी तसेच न्याय आणि हक्कांसाठी सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. मोर्चाच्या यशासाठी विविध संघटनांचे पदाधिकारी आपल्या कार्यक्षेत्रात जनजागृती मोहीम राबवत असून युवक, महिला, अधिकारी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रांतील समाजबांधवांचा सहभाग वाढविण्यासाठी व्यापक नियोजन सुरू असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

२० वी पुण्यतिथी



स्व. विजया सि. कुशे
स्वर्गवास : १४-६-२००६
यांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो !
त्यांच्या सदैव आठवणीने व्याकुळ असलेला
कुशे परिवार तसेच दादर इलेक्ट्रिक इन्स्टिट्यूट,
कुशे ब्रदर्स, विजया एजन्सी व हितचिंतक